रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २८९
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ८ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा राजीनामा/२

मुलीसोबत गैरवर्तनाचा प्रयत्न; आरोपी ताब्यात/५

शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रणव पुजारीला विजेतेपद/८

## महाराष्ट्र बोर्डाचा दहावीच्या परीक्षेचा आज निकाल

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी (दि.८) दुपारी १ वाजता निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला जाणार आहे. तत्पूर्वी सकाळी ११ वाजता शिक्षण मंडळाची पत्रकार परिषद होईल. दहावीचा निकाल https://sscresult.mahahsscboard.in/, https://results.targetpublications.org/, https://results.digilocker.gov.in , https://mahahsscboard.in, https://results.navneet.com या संकेतस्थळावर पाहता येणार आहे. विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष आता या निकालाकडे लागले आहे. निकाल लवकर जाहीर झाल्याने पुढील प्रवेश प्रक्रिया आणि अकरावीच्या शैक्षणिक वर्षाची वेळेत सुरुवात होण्यास मदत होणार आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे हेलिकॉप्टर वादळात फसले

# इमर्जन्सी लँडिंग; सर्व जण सुखरूप

**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका मोठ्या संकटातून बचावले आहेत. त्यांच्या हेलिकॉप्टरला गुरुवारी (दि.७) दुपारी खराब हवामानाचा मोठा फटका बसला. उड्डाण केल्यानंतर काही वेळातच हेलिकॉप्टर वादळी वाऱ्याच्या तडाख्यात सापडल्याने एकच खळबळ उडाली होती, मात्र वैमानिकाने दाखवलेले कौशल्य आणि प्रसंगावधान यामुळे हे हेलिकॉप्टर सुरक्षितपणे खाली उतरवण्यात यश आले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरुवारी नियोजित दौऱ्यासाठी निघाले होते. मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथील हेलिपॅडवरून त्यांनी हेलिकॉप्टरने उड्डाण केले. त्यांचा हा दौरा कल्याण आणि मुरबाड परिसरासाठी आयोजित करण्यात आला होता. सुरुवातीला सर्व काही सुरळीत वाटत असतानाच हेलिकॉप्टर कल्याण परिसराच्या जवळ पोहचले आणि अचानक निसर्गाचा प्रकोप पहायला मिळाला.





हेलिकॉप्टर हवेत असतानाच अचानक जोरदार वादळी वारे सुरू झाले. या वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की हेलिकॉप्टर त्यामध्ये अडकले. अशा कठीण परिस्थितीत हेलिकॉप्टरवर नियंत्रण मिळवणे आव्हानात्मक होते, पण पायलटने आपले सर्व कौशल्य पणाला लावले आणि हेलिकॉप्टर जुहू एअरपोर्टच्या दिशेने नेत तिथे अत्यंत सुरक्षितपणे लँडिंग केले.

या प्रवासात उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत त्यांचा ताफा हेलिकॉप्टरमध्ये होता. यामध्ये त्यांचे स्वीय सहाय्यक प्रभाकर काळे, मुख्य जनसंपर्क अधिकारी विनायक पात्रूडकर, ओएसडी राजपूत आणि मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्यासह एकूण आठ जण हेलिकॉप्टरमध्ये होते. या सर्वांचा जीव काही काळ टांगणीला लागला होता, मात्र लँडिंग झाल्यानंतर सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

दरम्यान, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला तीन महिन्यांपूर्वी भीषण अपघात झाला होता. त्यामध्ये त्यांचे निधन झाले. या अपघातनंतर आता उपमुख्यमंत्री शिंदे यांचे हेलिकॉप्टर वादळात फसले होते. सुदैवाने ते बचावले आहेत.



## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांचे कार्य अद्वितीय

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे उद्गार

### शेलघर येथील निवासस्थानी अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांनी आपले संपूर्ण आयुष्य बहुजन हिताय, बहुजन सुखाय या तत्त्वासाठी वेचले. त्यांच्या अद्वितीय कार्यामुळेच आपल्या परिसराला नावलौकिक प्राप्त झाला आहे, असे उद्गार भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि.७) शेलघर येथे काढले. भगतसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, शकुंतला ठाकूर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर आदींनी स्व. जनार्दन भगत यांच्या पवित्र स्मृतीस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

भगतसाहेबांनी शिक्षण आणि न्यायदानाचे महत्त्वपूर्ण कार्य करून सर्वसामान्य माणसाला आधार दिला. गावांमधील तंटे सोडवताना कोणावरही अन्याय होणार नाही याची त्यांनी नेहमीच सामाजिक भूमिकेतून काळजी घेतली, अशा शब्दांत मान्यवरांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

या अभिवादन कार्यक्रमास भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, संजय भगत, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, वसंतशेठ पाटील, अरुणशेठ ठाकूर, जयवंत देशमुख, जितेंद्र म्हात्रे, विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच सचिन घरत, अशोक कडू यांच्यासह स्वप्नील ठाकूर, कृपेश कांडपिळे, प्रकाश भगत, अजय भगत, इतर अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी सामंजस्य करार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक गरजांसाठी शाश्वत आणि पर्यावरणपूरक जलवाहतूक व्यवस्था उभारण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पामुळे देशात आधुनिक जलवाहतुकीचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि नॉर्वेस्थित मे. हायके एएस या सागरी तंत्रज्ञान कंपनीदरम्यान गुरुवारी (दि.७) सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. प्रकल्पासाठी आधुनिक जलयाने उपलब्ध करून देणे तसेच महाराष्ट्रात जहाजबांधणी सुविधा निर्माण करण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

करार करतेवेळी मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सल्लागार (गुंतवणूक आणि धोरण) कौस्तुभ धवसे,, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., नॉर्वेच्या मानद कॉन्सुल जनरल मोनिका नागेलगार्ड, स्वीडनचे कॉन्सुल जनरल स्वेन ऑस्टरबर्ग, हायकेचे अध्यक्ष चार्ल्स पेम्ब्रोक बिर्स आदी उपस्थित होते.

वर्षा निवासस्थानी हा करार झाल्यानंतर उपस्थितांना संबोधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दहा वर्षांपासून शाश्वत जलवाहतुकीच्या संकल्पनेवर राज्य शासनाचे सातत्याने काम सुरू आहे. मुंबईत सुरू होत असलेली ही संकल्पना देशातील इतर शहरांसाठीही मार्गदर्शक ठरेल. **(पान २ वर..)**

## अल्पवयीन मुलींचा विनयभंग करणाऱ्या नराधमाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

शाळेत शिक्षिकेने दिलेल्या 'गुड टच आणि बॅड टच'च्या माहितीमुळे एका नराधमाचे संतापजनक कृत्य उघडकीस आले आहे.

तीन अल्पवयीन मुलींची छेड काढल्याप्रकरणी आरोपी पंकज अजयसिंग सिंग (२८, रा. कामोठे, सेक्टर १५) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात ४ मे रोजी 'पॉक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

## निवडक

### पश्चिम बंगालची विधानसभा विसर्जित; ममतांना दणका

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात गुरुवारी (दि.७) एका मोठ्या सत्तांतराची अधिकृत नोंद झाली. येथील विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येताच राज्यपालांनी संपूर्ण मंत्रिमंडळ बरखास्त केल्याने ममता बॅनर्जी यांचे मुख्यमंत्रिपद आता संपुष्टात आले आहे. राजीनाम्यावरून सुरू असलेल्या राजकीय ओढाताणीच्या पार्श्वभूमीवर थेट घटनात्मक प्रक्रियेद्वारे हा निर्णय घेण्यात आला असून यामुळे बंगालमधील १५ वर्षांच्या जुन्या सत्ताकाळाचा एक अध्याय समाप्त झाला आहे.

### पायधुनीतील चौघांचा मृत्यू उंदीर मारण्याच्या औषधामुळे!


**मुंबई :** येथील पायधुनी परिसरात डोकाडिया कुटुंबातील चारही सदस्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. सुरुवातीला बिर्याणी, कलिंगडमधून विषबाधा झाल्याची चर्चा होती, मात्र उंदीर मारण्याच्या औषधाने चौघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. चौघांच्याही शरीरात उंदीर मारण्याच्या औषधाचे झिंक फॉस्फाईटचे अंश सापडले आहेत.

## कर्जतमध्ये अवकाळी पावसाचा तडाखा

### लग्नसराईत गोंधळ, मांडवात पाणीच पाणी!

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात गुरुवारी (दि.७) दुपारनंतर अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी लग्नसराईच्या काळात आलेल्या या अवकाळी पावसाने वधू-वर पक्षांची तारांबळ उडाली. अनेक ठिकाणी लग्न मंडपात पाणी शिरले, तर काही ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मांडवाचा भाग उडाल्याच्या घटना घडल्या.



कर्जत तालुक्यातील नेरळ, कर्जत, माथेरान तसेच कशेळे परिसरात जवळपास दीड तास मुसळधार पाऊस पडला. अचानक झालेल्या या पावसामुळे बाजारपेठा, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी नागरिकांची एकच धावपळ उडाली. कशेळे भागात जोरदार वादळी वारे सुटल्याने अनेकांच्या पत्र्याचे छप्पर उडाले. दुसरीकडे लग्न समारंभासाठी उभारण्यात आलेल्या मंडपांमध्ये पाणी साचून चिखल निर्माण झाला. त्यामुळे तेथे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. लग्नाची तिथी असल्याने विवाह सोहळा असलेल्या कुटुंबांच्या तोंडचे पाणी पळाले होते, परंतु पाऊस थांबल्यानंतर गोरज मुहूर्तावर विवाह लागले.

नेरळ पोस्ट ऑफिस परिसरातील सनी पॅलेसजवळ उभारण्यात आलेली "ममदापूर ग्रामपंचायत" अशी नोंद असलेली जुनी लोखंडी कमान वादळी वाऱ्यामुळे अचानक कोसळली. सुदैवाने त्या वेळी परिसरात रहदारी कमी असल्याने अनर्थ टळला.

## आमदार प्रवीण दरेकर यांचा महाड दौरा

### विविध विकासकामांचे उद्घाटन, ग्रामस्थांचा पक्षप्रवेश



**महाड : प्रतिनिधी**

भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांनी गुरुवारी (दि.७) महाडचा दौरा केला. यावेळी सावरट हिरकणीवाडी पंचक्रोशीतील गावांमधील असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला तसेच आमदार दरेकर यांच्या प्रयत्नातून व भाजपच्या माध्यमातून या ठिकाणी विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले.

या दौऱ्यादरम्यान पंचक्रोशीतील नागरिकांनी रायगड विकास प्राधिकरणाच्या कामांच्या तक्रारींचा पाढा आमदार दरेकर यांच्याकडे वाचला. त्यावर या विभागातील दुर्भिक्ष्य लक्षात घेऊन रायगड विकास प्राधिकरणच्या कामांचा आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

किल्ले रायगडच्या पायथ्याशी असलेल्या सावरट, हिरकणीवाडी, नेवाळेवाडी, खडकीवाडी, आमडोशी येथील कार्यकर्त्यांनी सागर हिरवे व सरपंच चंद्रकांत मोरे यांच्या प्रयत्नातून आमदार प्रवीण दरेकर यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. दरम्यान, दरेकर यांच्या हस्ते पंचक्रोशीतील विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास जि.प.चे कृषी सभापती वैकुंठ पाटील, युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, बिपीन महामुणकर, अमित मोरे, नागेंद्र राठोड, निलेश देवगिरकर, सोपान जामदार, बापू सोनगिरे, महेश शिंदे, अनिल मोरे, संकेत पोरे, चंद्रजीत पालांडे, नाना मोरे, सुनील सोंडकर, शुभम भावेकर आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### रायगड विकास प्राधिकरणाच्या कामांचा घेणार आढावा

यावेळी या ठिकाणी जमलेल्या असंख्य नागरिकांनी रायगड विकास प्राधिकरणच्या माध्यमातून २१ गावांमध्ये जी काही मूलभूत विकासकामे होत आहेत, त्याबाबत नाराजी व्यक्त करत ही कामे निकृष्ट दर्जाची व अनावश्यक ठिकाणी होत असून गरजेच्या ठिकाणी हा निधी वापरला जात नसल्याच्या तक्रारी व्यक्त केल्या. हे सर्व ऐकल्यानंतर आमदार प्रवीण दरेकर यांनी रायगड विकास प्राधिकरणच्या कामांचा आढावा घेतला असल्याचे सांगितले.

## पनवेलचा वडाळे तलाव होणार जलपर्णीमुक्त

### महापालिकेकडून जैविक नियंत्रण मोहिमेचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहराचे भूषण आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या वडाळे तलावाच्या संवर्धनासाठी येथील महापालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जैविक नियंत्रण मोहिमेंतर्गत अत्यंत कमी खर्चात 'साल्व्हिनिया विविल' हे भुंग्याच्या प्रजातीतील किडे वडाळे तलावातील जलपर्णी नष्ट करतील व वडाळा तलाव पुर्ववत सुंदर होणार असल्याचे महापौर नितीन पाटील यांनी सांगितले.



वडाळे तलावात वाढलेल्या 'साल्व्हिनिया मोलेस्टा' या आक्रमक जलपर्णीच्या निर्मूलनासाठी जैविक नियंत्रण मोहिमेचा शुभारंभ गुरुवारी (दि.७) महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते तलावात 'साल्व्हिनिया विविल' या जैविक कीटकांचे विसर्जन करून करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम महिला बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, समाजसेविका ज्योती नाडकर्णी, रंजना सडोलीकर, आसीएआर संस्थेच्या संशोधिका डॉ. अर्चना अनोखे, दिक्षा एजी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्थानिक भाषेत 'चायनीज झालर' म्हणून ओळखली जाणारी ही जलपर्णी अत्यंत वेगाने वाढणारी असून ती तलावातील पाण्यावर दाट थर निर्माण करते. त्यामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन मासेमारी, जलचर जीवसृष्टी व जैवविविधतेवर प्रतिकूल परिणाम होतो तसेच तलावात डासांची पैदास वाढून आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता वाढते.

या समस्येवर उपाय म्हणून पनवेल महापालिकेने पर्यावरणपूरक व शाश्वत अशी जैविक नियंत्रण पद्धत स्वीकारली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयसीएआरआय या कृषी क्षेत्रात संशोधन करणाऱ्या राष्ट्रीय संस्थेच्या सहकार्याने जलपर्णी नष्ट करण्यावरच्या शाश्वत उपाययोजना अवलंब पालिकेने केल्याने वडाळा तलाव पुन्हा एकदा जलपर्णीमुक्त होणार आहे. या मोहिमेचे प्राथमिक परिणाम पुढील सहा ते आठ महिन्यांत दिसण्यास सुरुवात होईल, तर सुमारे १५ ते १८ महिन्यांत वडाळे तलाव पूर्णपणे जलपर्णीमुक्त होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## सावत्र बापाचा मुलीवर अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

सावत्र बापाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा प्रकार पनवेलजवळील करंजाडे येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी ३४ वर्षीय नराधमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील पीडित मुलगी १५ वर्षांची असून सावत्र बापाने ऑगस्ट २०२४पासून ते ७ फेब्रुवारी २०२६पर्यंत करंजाडे येथील राहत्या घरी तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. तब्बल दीड-दोन वर्ष मुलीवर अत्याचार सुरू होते. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर नातेवाईकांनी आरोपीविरोधात पोलिसात तक्रार दाखल केली. आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीवर यापूर्वीही अन्य गुन्हा दाखल असून त्याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याची तयारी पोलिसांनी सुरू केली आहे.

## अलिबागच्या जलतरणपटूला प्रतिष्ठेचा पुरस्कार

### सारा वर्तकची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील अवघ्या सात वर्षांची जलतरणपटू सारा अभिजीत वर्तक हिने केलेल्या कामगिरीची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडन यांनी घेतली आहे. ३० एप्रिल २०२६ रोजी नेपाळमधील काठमांडू येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार समारंभात साराला धरमतर जेट्टी ते गेटवे ऑफ इंडिया हे ३६ किमी अंतर पोहून पूर्ण करणारी सर्वात लहान भारतीय जलतरणपटू म्हणून अधिकृत नोंद करून गौरविण्यात आले.



सारा वर्तक हिने आपल्या अचाट जिद्द आणि धैर्याच्या जोरावर जागतिक स्तरावर नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. ९ डिसेंबर २०२५ रोजी साराने अरबी समुद्रात धरमतर जेट्टी ते गेटवे ऑफ इंडिया हे अत्यंत आव्हानात्मक तब्बल ३६ किमी अंतर एकटीने अवघ्या नऊ तास ३२ मिनिटांत पोहत पूर्ण करत सर्वात लहान वयाची जलतरणपटू म्हणून इतिहास रचला. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, सातत्यपूर्ण सराव आणि प्रशिक्षक रुग्वेद पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

सध्या सारा पनवेल येथे राहत असून भविष्यात आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये देशाचे नाव उज्ज्वल करण्याचा तिचा निर्धार आहे. यापूर्वीही साराच्या कामगिरीची दखल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स यांनी घेतली आहे. तिचे कौतुक होत आहे.

# ‘विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करा’

**मुंबई : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. विद्यार्थ्यांची फसवणूक आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान मुळीच खपवून घेतले जाणार नाही विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करा असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी प्रशासनाला दिले.



वांद्रे, मुंबई येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या फसवणूक प्रकरणाची गंभीर दखल घेत दोषी संस्थांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयात १३२ हून अधिक विद्यार्थ्यांना बोगस अभ्यासक्रम आणि पदव्या देऊन फसविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचा सविस्तर आढावा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी घेतला. यावेळी सदर मान्यताप्राप्त वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नसलेला अभ्यासक्रम सुरू करुन विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याबद्दल या संस्थेच्या मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या कायदयाअंतर्गत असलेल्या तरतूदी विचारात घेऊन त्यानुसार कारवाई करण्याचेही निर्देश मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

तसेच महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तत्र प व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्याचेही त्यांनी निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता तपासून घ्यावी उच्च शिक्षण संचालनालय तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा असेही आवाहन मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले आहे.

भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी विभागाने एक विशेष कार्यप्रणाली तयार करावी. त्याचप्रमाणे वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या १३२ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातून नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील रिकगनिशन प्रायर लर्निंग तरतूदीनुसार या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासले जाईल यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदने अभ्यासून त्यानुसार कार्यवाही करावी अशा सूचनाही मंत्री उच्च व तंत्र शिक्षण चंद्रकांतदादा पाटील यांनी बैठकीत दिल्या.

या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी उपस्थित होते.

# सहकार वाढविण्याचा रायगडसह कोकणच्या जनतेने प्रयत्न केला पाहिजे

## आमदार प्रवीण दरेकर यांचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार वाढविण्याचा रायगड व कोकणच्या जनतेने प्रयत्न केला पाहिजे याच सहकार चळवळीच्या माध्यमातून चांगले प्रकल्प कोकणात कसे येतील त्यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत असे प्रतिपादन महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं समुह पुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष ना.प्रविण दरेकर यांनी रायगड जनता नागरी सहकारी पतपेढीच्या माणगाव शाखेच्या उदघाटन प्रसंगी कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. या पतसंस्थेच्या माणगाव शाखेला राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री ना.भरत गोगावले यांच्यासह अनेक मान्यवरांनी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.



सहकार क्षेत्रातील अग्रगण्य पतसंस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या रायगड नागरी सहकारी पतपेढी मर्यादीत मुंबई या पतसंस्थेच्या माणगाव शाखेचा उद्घाटन समारंभ गुरुवार दि. ७ मे रोजी ना. प्रविण दरेकर यांच्याहस्ते उत्साहात संपन्न झाला. यावेळी ना.प्रवीण दरेकर यांनी उदघाटक म्हणून उपस्थितांना बहुमोल असे मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात बोलताना ना.दरेकर पुढे म्हणाले कि,अनेक गोष्टी आज सहकाराच्या माध्यमातून राज्यात उभ्या राहिल्या आहेत. राज्यातील अनेक सहकारी संस्था पाहता कोकणातील ज्या – ज्या संस्था उभ्या राहिल्या आहेत कोकणातील त्या संस्था आज प्रभावीपणे लोकांसाठी काम करताना दिसत आहेत. कोकणी माणूस हा कुठलीही संस्था चालविताना सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संस्था चालवीत असल्याने या संस्था यशस्वी होत आहेत.या संस्थेला जे काही सहकार्य लागेल तो माझ्यासारखा कार्यकर्ता निश्चितच करेल असे सांगत त्यांनी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,सर्व संचालक,कर्मचार िवर्ग,सभासद,हितचिंतक यांना खास शुभेच्छा दिल्या.

# जेएनपीए बंदरात दररोज १०-१२ कंटेनर जहाजांची वर्दळ; २२ हजार टीईयू कंटेनर मालाची हाताळणी

**उरण : प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) – देशातील नामांकित कंटेनर बंदर, सीएफएसएआय आणि बीसीबीए यांनी नुकत्याच जारी केलेल्या सूचनांच्या पार्श्वभूमीवर आपल्या कंटेनर टर्मिनल्सच्या कार्यान्वयन स्थितीबद्दल स्पष्टीकरण देऊ इच्छिते.की, जेएनपीए येथील सर्व पाच कंटेनर टर्मिनल्स सुरळीतपणे कार्यरत असून कोणतीही गर्दी किंवा अडथळा नसतांना पूर्ण कार्यक्षमतेने सेवा सुरू आहेत. जेएनपीए बंदरात दररोज सरासरी १०ते १२कंटेनर जहाजांची वर्दळ असून, आयात–निर्यात मिळून सुमारे २२ हजार टीईयू कंटेनर मालाची हाताळणी केली जात आहे.गेट ऑपरेशन्सदेखील स्थिर असून, दररोज सुमारे २०हजार टीईयू मालाची रस्तेमार्गे तर २ हजार टीईयू मालाची रेल्वेमार्गे वाहतूक केली जात आहे.

गर्दीबाबत करण्यात येत असलेल्या दाव्यांच्या विपरीत, बंदरातील कामकाज कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरळीत सुरू आहे.सध्याची अडचण ही बंदर टर्मिनल्समध्ये नसून, कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएस) आणि कस्टम ब्रोकर्स (सीबी) यांच्याकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या ट्रेलर्स आणि चालकांच्या कमतरतेमुळे निर्माण झाली आहे.सीएफएस आणि सीबी यांची जबाबदारी टर्मिनल यार्डमध्ये ठेवण्यात आलेले आयात कंटेनर्स हे सीएफएस किंवा सीबी यांच्याकडून



ट्रेलर्स उपलब्ध करून दिल्यानंतरच वितरित केले जातात. पुरेशा संख्येने ट्रेलर्स उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. सुट्ट्या किंवा अनुपस्थितीमुळे चालक उपलब्ध नसल्यास, पर्यायी व्यवस्था तातडीने करणे आवश्यक आहे.टर्मिनल्समध्ये ट्रेलर्सची कोणतीही प्रलंबित रांग नाही कंटेनर वितरण प्रक्रिया जलद करण्यासाठी टर्मिनल्सकडून अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. लोडिंगसाठी ट्रेलर्स प्रतीक्षेत असल्याची कोणतीही परिस्थिती नाही. उलट, चालकांच्या कमतरतेमुळे टर्मिनलमध्ये येणाऱ्या ट्रेलर्सची संख्या कमी झाली आहे.ही महत्वपूर्ण स्पष्टीकरणे आहेत.

रेल्वे सायडिंग असलेल्या जवळील सीएफएस पर्यंत कंटेनर्सची रेल्वेमार्गे जलद वाहतूक सुलभ करणे. मंजुरी प्रक्रियेला गती देण्यासाठी सीमाशुल्क विभागाशी समन्वय साधणे. सध्या सुट्टीवर असलेल्या चालकांना परत आणण्यासाठी पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश येथून विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था करून व्यापार क्षेत्राला सहाय्य करणे.या जेएनपीएकडून करण्यात येत असलेल्या सक्रिय उपाययोजना आहेत.जेएनपीएची एकूण कंटेनर साठवण क्षमता १.७६लाख टीईयू इतकी आहे. सामान्य परिस्थितीत ऑक्युपन्सी ९०,हजार ते १ लाख टीईयू दरम्यान असते. मध्यपूर्वेतील भू–राजकीय परिस्थितीमुळे ट्रान्सशिपमेंट कार्गोमध्ये वाढ झाल्याने ७ मे २०२६ रोजी ऑक्युपन्सी १.१८ लाख टीईयू इतकी नोंदविण्यात आली असून, ती एकूण क्षमतेच्या केवळ ६७टक्के आहे. यापैकी फक्त२६ हजार टीईयू हे ट्रान्सशिपमेंट कंटेनर्स असून, त्यामुळे कोणतीही गर्दी निर्माण झालेली नाही.

ऑक्युपन्सीमध्ये झालेली वाढ ही केवळ सीएफएस आणि सीबी यांच्याकडून ट्रेलर्सच्या उपलब्धतेत झालेल्या विलंबामुळे आहे.जेएनपीए पुन्हा एकदा स्पष्ट करत आहे. की, बंदरातील कामकाजात कोणतीही गर्दी किंवा अडथळा नाही. मात्र, आयात कंटेनर्सची प्रलंबित स्थिती दूर करण्यासाठी सीएफएस आणि कस्टम ब्रोकर्स यांनी तातडीने पुरेशा संख्येने ट्रेलर्स आणि चालकांची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. जेएनपीए सर्वतोपरी सहकार्य करण्यास सज्ज आहे.तथापी , कंटेनर्सच्या वाहतूक व निकासीची प्राथमिक जबाबदारी सीएफएस आणि सीबी यांच्यावरच आहे.जेएनपीए आपल्या ग्राहकांना सर्वोत्तम सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे. टर्मिनल यार्डमधून आयात कंटेनर्सची सुरळीत निकासी सुनिश्चित करण्यासाठी सीएफएस आणि कस्टम ब्रोकर्स यांनी तातडीने पुरेशा संख्येने ट्रेलर्स आणि चालकांची व्यवस्था करावी. असे आवाहन जेएनपीएच्या वतीने करण्यात येत आहे.

# मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा राजीनामा

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केला. पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांच्या जवळचे म्हणून ओळखले जाणारे जितेंद्र पाटील यांनी जिल्हा अध्यक्ष पदावर दहा वर्षे काम केले. नवीन चेहऱ्यांना संधी देण्यासाठी जितेंद्र पाटील यांनी राजीनामा दिला असून पक्षाच्या रेल्वे संघटनेचे अध्यक्ष म्हणून पूर्वीपासून जितेंद्र पाटील यांच्याकडे जबाबदारी आहे.

२०१६ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी मनसेचे रेल्वे युनिट मध्ये सरचिटणीस पदावर काम करणारे जितेंद्र पाटील हे मनसेचे गोटामधील जवळचे कार्यकर्ते समजले जात होते. रायगड जिल्ह्यातील संघटन चांगले असल्याने ते अधिक मजबूत करण्यासाठी जितेंद्र पाटील यांच्याकडे जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली. प्रामुख्याने मराठी तरुणांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी जितेंद्र पाटील यांची धावपळ सुरू असायची. जे एस डब्लू मध्ये मराठी तरुणांच्या न्याय हक्कासाठी आवाज उठवणारे जितेंद्र पाटील तरुणांचे हक्काचे समजले जातात.

पक्षाच्या माध्यमातून महिलांना शिवणकला मशीन भेट देण्याचे कार्य तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना संगणक भेट देणे अशी विविध कामे त्यांच्या माध्यमातून मनसेचे वतीने झाली आहेत.जिल्हात अनेक आंदोलने करून प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचा पुढाकार घेतला होता. मनसेचे रायगड चषक क्रिकेट स्पर्धेचे निमित्ताने रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना गेली चार वर्षे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहेत. या स्पर्धेचे निमित्ताने पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे तसेच युवानेते अमित ठाकरे यांनी भेट दिली होती. असे हे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आज पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन राजीनामा सुपूर्द केला. पाटील मनसेचे रेल्वे युनिटचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.

# खालापुरात धुळीच्या वादळानंतर पावसाची हजेरी; पारा घसरला!





**खोपोली : प्रतिनिधी**

चाळीशी पर्यंत पोहोचलेला पारा गुरुवारी अचानक वातावरणात झालेल्या बदलामुळे आणि पावसाच्या हजेरीने खाली आला.

गुरुवारी दुपारी तीन वाजता खालापूर, रसायनी ,चौक परिसरात मोठ्या प्रमाणात धुळीचे वादळ आणि सोसाट्याचा वारा सुटला होता .त्यानंतर काही वेळातच पावसाने जोरदार हजेरी लावली. पंधरा मिनिटं पडलेल्या पावसाने वातावरणात सुखद गारवा निर्माण केल्याने मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यात दिलासा मिळाला.


पावसाच्या अचानक हजेरीने नागरिकांची मात्र तारांबळ उडाली दिसत होती. मुंबई पुणे एक्सप्रेस वेळेवर वादळी वाऱ्यामुळे झाडाच्या फांद्या पडल्याचे घटना घडली, मात्र सुरक्षा यंत्रणांनी ही ताबडतोब बाजूला केल्याने कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

खोपोली शहरातही सोसायटीच वारा आणि त्यानंतर काही काळ पावसाच्या सरी पडल्या, या घटनेने बाजारात आलेल्या नागरिकांनी आजूबाजूच्या इमारती व दुकानांचा आसरा घेतला साप्ताहिक बाजारात मात्र ग्राहकाची धांदल उडाली. रस्त्यावरुन जाणार्या वाहनांचा हि वेग़ मंदावल्याने काही काळ वहातुक कोंडी झाली होती. पण कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

# रयत शिक्षण संस्थेच्या वतीने उद्या कर्मवीर पुण्यतिथी कार्यक्रम

**सातारा : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, आधुनिक शिक्षण भगीरथ पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा ६७वा पुण्यतिथी कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेच्या वतीने शनिवार, दि. ९ मे २०२६ रोजी सकाळी ८.३० वा कर्मवीर समाधी परिसर, सातारा या ठिकाणी आयोजित केला आहे.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार उपस्थित राहणार आहेत. पुण्यतिथी कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हा. चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिलचे सर्व सन्माननीय सदस्य, जनरल बॉडी सदस्य, संस्थेचे लाईफ मेंबर, लाईफ वर्कर, संस्थेचे हितचिंतक, पदाधिकारी, सर्व शाखांचे शाखाप्रमुख यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला आहे.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी देणगी रूपाने विशेष योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार खासदार शरद पवार यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये थोर देणगीदार संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला रामशेठ ठाकूर, प्रतापराव गोविंदराव पवार, ॲड. अशोक बोरा, मे.पंचशील फौंडेशन, पुणे, फिनोलेक्स केबल लि., पिंपरी, बी. जी. शिर्के कंस्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लिमिटेड व इतर मान्यवरांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

याप्रसंगी संस्थेच्या वतीने 'रयत मासिक', 'रयत विज्ञान पत्रिका' तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष मा. बापूसाहेब नाथाजीराव नलावडे यांनी लिहिलेले 'कर्मवीर सांगाती' या पुस्तकाचे प्रकाशन खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. त्याचबरोबर रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक विकास करून समाजाच्या विकासामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या संस्थेच्या विविध शाखांना कर्मवीर पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर माध्यमिक आणि महाविद्यालय स्तरावर शैक्षणिक, सामाजिक, संशोधनात्मक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्राध्यापक व शिक्षकांना 'यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सातारा शहरातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले आहे.

पान १ वरुन

## मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी सामंजस्य करार

यावेळी मस्त्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले, मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्प हा राज्याच्या सागरी विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. मे. हायके एएस यासारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीसोबत होणारा हा करार महाराष्ट्रातील बंदर विकास, जहाजबांधणी आणि सागरी कौशल्यविकासासाठी नवी दिशा देणारा ठरेल. भविष्यात जलवाहतूक अधिक सुरक्षित, आधुनिक आणि प्रवासी–अनुकूल करण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे, असेही ते म्हणाले.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा होणार वापर**

एमएमआरमध्ये प्रवासी जलवाहतुकीसाठी वॉटर मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी मे. कोची मेट्रो रेल लि. यांच्यामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. या डीपीआरमध्ये सध्या प्रवासी वाहतूक होत असलेल्या विद्यमान २१ जलमार्गांवरील २४ टर्मिनलचे अद्ययावतीकरण (अपग्रेडेशन) करणे आणि नव्याने सुरू करावयाच्या १० नवीन जलमार्गांमध्ये २१ टर्मिनलची निर्मिती करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन बनविलेली जलयाने उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा मानस आहे.

## आमदार प्रवीण दरेकर यांचा महाड दौरा

आमदार प्रवीण दरेकर पुढे म्हणाले की, पश्चिम बंगालमध्ये इतिहास घडला, जनतेने या ठिकाणी गुंडशाही विरोधात मतदान केले आणि भाजपला निवडून दिल. तुम्हीदेखील कोणाच्याही गुंडगिरीला भिक घालू नका. मी आणि पक्ष तुमच्यासोबत आहे, कारण तुम्ही सगळे भाजप पक्षात नव्हे; तर भाजप परिवारात आला आहात.

कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी, पशुसंवर्धन विभागाचे बजेट ४०० कोटींवरून ४५०० कोटी करण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यातील ३५ लाख गाई व दुग्धव्यवसायासाठी देणार असून तरुणांनी या व्यवसायात यावे, असे आवाहन त्यांनी केले. जलजीवन योजना केवळ पाईप टाकण्यापुर्ती मर्यादित न राहता आता यापुढे कोणाचीही गय केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बिपीन महामुणकर यांनी प्रवीणभाऊ आपल्या पाठीशी आहेत. त्यामुळे तुमची सर्व कामे आम्ही प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन

# रायगडात उद्या राष्ट्रीय लोक अदालत

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने जिल्हा व सत्र न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये शनिवारी (दि. 9 ) राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोक अदालतीमध्ये प्रलंबित दिवाणी व फौजदारी स्वरूपाची तडजोडपात्र प्रकरणे, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम 138 अंतर्गत धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणे, भूसंपादन, कौटुंबिक वाद, मोटार वाहन अपघात दावे, कामगार व औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकांची प्रलंबित प्रकरणे तसेच बँका व वित्तीय संस्थांची वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

लोक अदालतीमध्ये दोन्ही पक्षांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळते. परस्पर संमतीने तडजोड होत असल्याने दोन्ही पक्षांचा वेळ आणि खर्च वाचतो. तसेच प्रकरण संमतीने निकाली निघाल्यास भरलेले न्यायालयीन शुल्कही परत मिळते.

## दुखवटा

### सुखीबाई ओसवाल



**कर्जत :** शहरातील महावीर पेठ मध्ये राहणाऱ्या सुखीबाई धनराज ओसवाल यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक कन्या, सूना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

खून, चोरी आणि हत्येचा प्रयत्न

# आरोपी संदीप गुप्ताला जन्मठेप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खून आणि चोरी तसेच फिर्यादीला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपी संदीप गुप्ता यास जिल्हा व सत्र न्यायाधीश उगले यांनी सनसनाटी निकाल दिला

गुन्हयाची हकीकत राम प्रसाद गुप्ता आणि त्यांची पत्नी लक्ष्मी देवी, उलवे येथील फलॅटवर दोघेच राहात होते. त्यांची तिन्ही मुले व एक मुलगी इतरत्र राहत होते. संदीप गुप्ता हा मयत रामप्रसाद हयांचा मुलगा सतीश हयाचा मेव्हणा आहे. त्यांने रामप्रसाद यांच्याकडून ७०,००० रू. उसने घेतले होते. सदरची रक्कम रामप्रसाद हे आरोपी संदीप कडे मागत होते. त्या रागातून चोरीच्या व खूनाच्या इरादयाने दिनांक २२/०४/२०१८ रोजी आरोपी संदीप हा रामप्रसाद यांच्या घरी आला. घरी रामप्रसाद व पत्नी दोघेच होते. लक्ष्मीदेवी घरात चहा बनवण्यासाठी गेले असता आरोपी संदीप हयांने रामप्रसाद हयास बेडरूममधे नेऊन चाकूने वार करून खून केला. पत्नी बेडरूममधे पाहण्यासाठी गेली असता आरोपीने तीच्याही गळ्यावर वार करून तिला बाथरूमधे आपटली त्यानंतर कपाटातून नऊ तोळे दागिने व ८०,००० रूपये चोरून आरोपीने पोबारा केला.




जखमी लक्ष्मीदेवी कशीबशी इमारती खाली येऊन तिने एका साक्षीदारा सामक्ष इंग्रजी पेपरवर 'सतीश के साले ने मेरे पती को मारा' असे लिहून ठेवले त्यानंतर तिला दवाखान्यात उपचारासाठी नेले दोन साक्षीदारांचा सतर्कतेने तिला ताबडतोब उपचार मिळाले व तिचे प्राण वाचले. तिची साक्ष हया खटल्यात महत्त्वाची ठरली. सदर गंभीर गुन्हा एन.आर.आय पोलीस ठाण्यात दाखल होउन पुढील तपास पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांनी केला होता.

पनवेल सेशन कोर्टात सरकारी वकील वाय. एस. भोपी यांनी हा खटला लढवला. सुनावणी दोन वर्ष चालली. १६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी वकीलांचा जोरदार युक्तीवाद मान्य करून कोर्टाने आरोपीस जन्मठेप व दोन वेळा ७-७ वर्ष सश्रम कारावास व ५०,००० रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली. दंडाची रक्कम व दागिने, रूपये ८०,००० फिर्यादी लक्ष्मीदेवी हिला देण्याचेही आदेश केले. सदर केसचे कामी पोलीस वाघचौरे, पोलीस गिरासे व आताच्या डी.वाय.एस.पी. स्मिता जाधव व साक्षीदारांचे मोलाचे सहाय्य लाभले.

# आकुर्ली-सूकापूर परिसरात नऊ तास बत्ती गूल; नागरिकांना फटका

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

बुधवार सहा मे रोजी रात्री पावणे नऊ वाजता गायब झालेली वीज तब्बल नऊ तासानंतर पहाटे पावणे सहाच्या दरम्यान आली. त्यामुळे हजारो वीज ग्राहकांना तब्बल नऊ तास अंधारात राहावे लागले.

आकुर्ली-सुकापूर येथे महानगर गॅसच्या कामादरम्यान झालेल्या नुकसानीमुळे २२ केव्ही नेरे मेन एचटी केबलमध्ये बिघाड झाला. मात्र वीजपुरवठा सुरू करण्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध नव्हती. संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा पूर्ववत होण्यासाठी सुमारे ९ तासांचा कालावधी लागला. रात्री पावणे नऊ वाजता गेलेली वीज पहाटे पावणे सहा वाजता आली. त्यामुळे रात्रभर वीज ग्राहकांना अंधारात राहावे लागले. संपूर्ण रात्रभर विद्युत कर्मचारी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत होते.

अचानक गेलेल्या विजेमुळे महावितरणचे कर्मचारी, अधिकारी यांना देखील रात्रभर जागावे लागले. महानगर गॅस कंपनीच्या खोदकामात निष्काळजीपणा केल्यामुळे वीज वाहिनी तुटली आणि ऐन उन्हाळ्यात नऊ तास बत्ती गुल झाली. त्यामुळे नागरिकांना रात्री अंधारात बसावे लागले. त्यानंतर महावितरणचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वीज वाहिनी दुरुस्ती करण्याचे काम सुरू केले. पहाटे पावणे सहाच्या दरम्यान त्यांनी हे काम पूर्ण केले. मात्र तब्बल नऊ तास वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे असंख्य ग्राहकांना आबाल वृद्धांना, मुलांना नाहक त्रास सहन करावा लागला.

# सर्व्हर डाऊन, नागरिकांना दाखले मिळेना!

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

तहसील सेतू कार्यालयाच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वारस दाखला, उत्पन्न दाखला व इतर महत्त्वाचे दाखले मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना व पालकांना महिनाभर प्रतीक्षा करावी लागत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. शासनाच्या नियमानुसार सात ते दहा दिवसांत काही दाखले देणे बंधनकारक असताना पनवेलमध्ये मात्र वीस दिवसांनंतरही दाखले मिळत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सर्वर डाऊन असल्यामुळे हे परिस्थिती ओढवले असल्याचे बोलले जात आहे.

नागरिकांच्या मते, गेल्या १५ दिवसांपासून सेतू कार्यालयाचे पोर्टल बंद असल्याचे सांगितले जात आहे. अर्जदारांना "तुम्हाला मोबाईलवर मेसेज येईल" असे सांगून वारंवार परत पाठवले जात असल्याने विद्यार्थी व पालकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः प्रवेश प्रक्रिया व शैक्षणिक कामांसाठी दाखल्यांची तातडीची गरज असताना होणारा हा विलंब विद्यार्थ्यांसाठी अडचणीचा ठरत आहे. दरम्यान, काही नागरिकांनी गंभीर आरोप करत म्हटले आहे की, दलालामार्फत अर्ज केल्यास हेच दाखले तीन ते चार दिवसांत मिळत आहेत. तसेच येथील सेतू कार्यालयातील कर्मचारी महिला नागरिकांशी उर्मट भाषा वापरत वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटा तुमचे दाखले असून १५ ते २० दिवसांनी भेटलीस असे उत्तर देत आहे.त्यामुळे कार्यालयातील पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होत असून यामागे गैरप्रकार होत असल्याची चर्चा सुरू आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन पोर्टल सुरू करावे, प्रलंबित दाखले लवकरात लवकर वितरित करावेत आणि दलालांच्या हस्तक्षेपाला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कळंबोली येथील दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये कॉपर पाइपची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली परिसरात चोरीच्या घटनांनी पुन्हा डोके वर काढले असून, चोरट्यांनी आता शैक्षणिक संस्थांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. कळंबोली येथील 'दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट'मधील एसीचे कॉपर पाईप अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास कापून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सेक्टर-५ई, केएल-१ परिसरातील इन्स्टिट्यूटच्या बाहेर बसविण्यात आलेल्या एसी युनिटमधील महागडे तांब्याचे पाईप चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत चोरी केले. सकाळी इन्स्टिट्यूट चालकाने हा प्रकार लक्षात घेतला. या घटनेमुळे संस्थेला आर्थिक फटका बसला असून, एसी बंद पडल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही अडथळे निर्माण झाले आहेत. दरम्यान, कळंबोली परिसरात गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच एका हळदी समारंभात महिलेचे सुमारे १८ तोळे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता एसी पाईप चोरीच्या घटनेमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तांब्याच्या वाढत्या किमतीमुळे अशा प्रकारच्या चोरींना चालना मिळत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिक व व्यावसायिकांनी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांवर लगाम लावावा, अशी जोरदार मागणी केली आहे.



## निवडक

### 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** अल्पवयीन मुलीला माझ्यावर प्रेम कर, माझ्याशी बोल नाही, तर मी जीव देईन आणि तुझासुद्धा जीव घेईन अशी धमकी दिल्याप्रकरणी आरोपी आकाश उमेश सोनगिरे (वय 21 रा. मुरबी गाव, सेक्टर 19) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात सहा मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फेब्रुवारी पासून 5 मे पर्यंत आकाश सोनगिरे याने अल्पवयीन मुलीला माझ्यावर प्रेम कर, माझ्याशी बोल, नाहीतर मी जीव देईन आणि तुझा सुद्धा जीव घेईन अशी धमकी दिली आणि तिला घाबरवले.

### पनवेल स्टेशन परिसरातून इसम बेपत्ता



**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून एक इसम बेपत्ता झाल्याची घटना घडली असून तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अंकुश सुरेश धुलप (वय ३७ वर्षे) असे या इसमाचे नाव असून त्याचा रंग सावळा, उंची ४ फुट ६ इंच, वांधा सडपातळ, चेहरा सरळ लांब, डोक्याचे केस काळे, अंगात नेसुस हीख्या रंगाचा टि शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, पायात चप्पल, मराठी, हिंदी भाषा बोलता येथे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक व्ही बी शिरसाठ यांच्याशी संपर्क साधावा

### घरफोडीत दागिने लंपास

**पनवेल :** घरात शिरून चोरट्याने सुमारे १४ लाख २५ हजारांचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाणे येथे ५ मे रोजी गुन्हा दाखल केला आहे. पनवेलच्या देवदगाव येथील अनमोल रेसिडेन्सीमध्ये राहणारे अक्षय प्रताप पाटील यांच्या घरात दरवाजातून प्रवेश करून ही चोरी झाली. घरातील कपाट उघडून सोन्याचे गंठण, राणीहार, अंगठ्चा असा सुमारे १४ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला.

### कामगार संघटनेचे उद्घाटन

**पनवेल :** तालुक्यातील संघटनेचे कार्यालय गोदरेज सिटी ठोंबरेवाडी, खानावळे येथे 'महाराष्ट्र राज्य बहुउद्देशीय माथाडी व ट्रान्सपोर्ट जनरल कामगार संघटनेचे' मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. अशोक हितेंद्र निकम (जिल्हाध्यक्ष नवी मुंबई व रायगड जिल्हा) यांच्या मार्गदर्शनाखाली खानावळे-ठोंबरेवाडी एकता संघ यांच्या वतीने या शाखेची स्थापना करण्यात आली असून उद्घाटन गोदरेजचे रचीत नेगी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी भाजप पोयंजे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष मंगेश लबडे यांच्यासह किरण लबडे, दिनेश लबडे, रुपेश मांडे, संदेश मांडे, सुभाष ठोंबरे, निखिल सोनावळे, मनोज लबडे, सचिन लबडे, योगेश शिंदे, रोहित ठाकूर, प्रविण सोनावळे, स्वप्निल लबडे आदीसंह संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष महेंद्र लबडे, जिल्हा उपाध्यक्ष नवी मुंबई व रायगड विलास ठोंबरे आदी उपस्थित होते.

# खोडसाळ वक्तव्य करणाऱ्या शंकर वायदंडेंवर कारवाई करा

## लोकमान्य नगर झोपडपट्टीवासीयांची पोलिसांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंचशील नगर येथे राहणारे शंकर मारुती वायदंडे हे गेल्या काही दिवसांपासून लोकमान्य नगर येथील पुनर्विकास प्रकल्पाबाबत जाणीवपूर्वक चुकीची आणि दिशाभूल करणारी वक्तव्ये करत आहेत. त्यामुळे त्यांची सखोल आणि कायदेशीर चौकशी करावी, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांना दिले.



या नऊ रहिवाशांनी पत्रात म्हटले आहे की, आम्ही लोकमान्य नगर झोपडपट्टी भागातील रहिवासी असून पंचशील नगर येथे राहणारे शंकर वायदंडे हे गेल्या काही दिवसांपासून लोकमान्य नगर येथील पुनर्विकास प्रकल्पाबाबत जाणीवपूर्वक चुकीची आणि दिशाभूल करणारी वक्तव्ये करत आहेत. त्यांनी असे विधान केले आहे की, "९ झोपडपट्टीधारकांच्या जागेवर बिल्डिंग बांधून त्यांच्याकडूनच पैसे वसूल केले जात आहेत आणि त्यांच्यावर १५ ते २० लाखांच्या कर्जाचा बोजा टाकला जात आहे. यामुळे रिक्षाचालक किंवा वृद्ध महिला हे कर्ज कसे फेडणार? त्या पुन्हा बेघर होतील." त्यांचे हे वक्तव्य अत्यंत खोडसाळपणाचे असून यामुळे येथील कष्टकरी महिला आणि नागरिकांच्या मनात पनवेल महापालिकेबद्दल अकारण भीती आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाच्या कल्याणकारी योजनांबाबत संभ्रम पसरवून वायदंडे येथील शांतता भंग करण्याचा प्रयत्न करत आहेत.

विशेष म्हणजे शंकर वायदंडे पंचशील नगर झोपडपट्टीतील स्वतः रहिवासी आहेत. त्यांची स्वतःची दोन वैयक्तिक घरे (फ्लॅट) असल्याचे समजते व त्यांना राहण्याची कोणतीही चिंता नाही. स्वतःचे हित सुरक्षित असताना ते केवळ गरिबांना भडकवण्याचे आणि त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचे काम ते करत आहेत. त्यांच्या या बेकायदेशीर वक्तव्यांमुळे सामान्य नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून भविष्यात यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यांच्या या कृतीमुळे वस्तीत शांतता भंग होत असून महिला एकमेकींकडे संशयाने बघत आहेत. सोशल मीडियावरील व प्रिंट मीडियावर त्यांच्या या चिथावणीखोर पोस्ट्समुळे कोणत्याही क्षणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

आपणांस विनंती आहे की, शंकर वायदंडे यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी आणि अशा प्रकारे खोटी माहिती पसरवून गरीब जनतेला घाबरवल्याबद्दल त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी व आम्हाला न्याय द्यावा, असेही लोकमान्य नगर येथील रहिवाशांनी पत्रात नमूद केले आहे.

# बँकेच्या कॅशियर विरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** बँकेच्या कॅशियरने 15 लाख 49 हजार 500 रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी आरोपी विकास किसन कदम याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात सहा मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.28 एप्रिल ते दोन मे दरम्यान जी एस महानगर को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शाखा पनवेल येथे कॅशियर या पदावर कार्यरत असणारे विकास किसान कदम यांनी लोकांनी विश्वासाने बँकेकडे संपवलेल्या मालमत्तेचा स्वतःच्या फायद्यासाठी ती रक्कम स्वतःची आहे असे वापरून 15 लाख 49 हजार पाचशे रुपयांचा अपहार केला. बँकेचे मॅनेजर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# एमएनएम विद्यालयात जनार्दन भगत यांचे पुण्यस्मरण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अहोरात्र ज्यांनी बहुजन हिताय आणि बहुजन सुखाय या तत्त्वाच्या पूर्ततेसाठी तसेच शिक्षण हे समाज परिवर्तन प्रभावी साधन आहे याचा ध्यास घेत समाजातील तळागाळातील लोकांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले असे जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे प्रेरणास्थान स्वर्गीय श्री जनार्दन भगत साहेबांची ३८वी पुण्यतिथी एम एन एम विद्यालयात साजरी करण्यात आली.

शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांनी जनार्दन भगत साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

वरील प्रसंगी कुणाल शेवाळ, कमलाकर देशमुख,प्राचार्या सायली वडवलकर , माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी, छत्रपती शिवाजी विद्यालयाचे चंद्रकांत मढवी एम एन एम, विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वर्गीय श्री जनार्दन भगत साहेबांना विनम्र अभिवादन केले.



उरण : अंगारक चतुर्थीनिमित्त चिरनेर येथील प्रसिद्ध महागणपतीच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी झाली होती.

# फोटो व्हायरल करण्याची धमकी; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलेच्या पतीला धक्काबुक्की करून आरोपीने महिलेचे नकळत काढलेले नग्न अवस्थेतील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्या प्रकरणी आरोपी विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील पीडित महिला आणि 28 वर्षीय आरोपी हे एकमेकांचे शेजारी समोरासमोर राहण्यास आहेत. त्यांच्यात दोन वर्षांपासून प्रेम संबंध आहेत. सदरचे प्रेम प्रकरण फिर्यादी यांच्या पतीला दोन महिन्यांपूर्वी माहिती झाले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी सोबत बोलणे आणि भेटणे बंद केले. त्यानंतर आरोपी याने फिर्यादी यांच्याकडे त्यांच्या घरासमोर येऊन सतत पाहणे तसेच भेटण्यासाठी बोलवणे सुरू केले, मात्र पीडित फिर्यादी या आरोपी यांना भेटत नसल्याने त्याने त्यांच्या पतीला धक्काबुक्की केली आणि आरोपी याच्या मोबाईल फोनमधील पीडित महिलेचे नकळत काढलेले नग्न अवस्थेतील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली.

# प्रामाणिकपणाचा आदर्श; अन्नु पारचे यांचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रभाग क्र. १८ मधील वाल्मिकी नगर येथे राहणाऱ्या व वाल्मिकी समाजातील अन्नु अशोक पारचे यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हाऊसकीपिंगचे काम करत असताना त्यांना रोख रक्कम व सुमारे दोन लाख रुपयांचा चेक सापडला. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तो चेक व रक्कम तात्काळ आपल्या वरिष्ठांकडे सुपूर्द केला. त्यांच्या या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व मूल्याधिष्ठित वर्तनाची दखल घेत संबंधित संस्थेकडून त्यांना सुपरवायझर पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पनवेल महापालिकेचे महापौर सन्माननीय श्री. नितीन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सोबत नगरसेवक दशरथ म्हात्रे हेही होते. अन्नु पारचे यांच्या या कृतीमुळे वाल्मिकी समाजाची प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणारी परंपरा अधोरेखित झाली आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



उलवे नोड : रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे येथे थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, संस्थेचे इंजिनियर दर्शन ठाकूर, शिक्षकवृंद, कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय

# संस्कृती नव्हे, विकृती!

राष्ट्रीय अस्मितेला सुखावणाऱ्या बाबींवर केवळ राजकीय हेतूने प्रश्नचिन्हे उमटविण्याचा प्रकार दुर्दैवी असतो. यामुळे देशाच्या प्रतिमेला आणि त्याविषयी सामान्य जनतेच्या मनात असलेल्या भावनांना धक्का पोहोचत नाही, पण कोत्या मानसिकतेचे राजकारण करणाऱ्यांच्या दुर्बुद्धीचे मात्र लखलखीत दर्शन घडते.

**जेव्हा आपल्या कर्तबगारीची क्षमता सिद्ध करता येत नाही, तेव्हा क्षमता असलेल्या प्रतिस्पर्ध्याच्या कर्तबगारीची रेषा पुसण्याचा प्रयत्न केला जातो. खरे म्हणजे, कर्तबगार प्रतिस्पर्ध्याच्या क्षमतेच्या रेषेहून अधिक लांबीची रेषा उमटवून आपली क्षमता सिद्ध करायची असते, पण राजकारणात सहसा तसे घडत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कर्तबगारीशी स्पर्धा करावयास निघालेल्या काही नेत्यांनी आता पुन्हा तेच केलेले दिसते. पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या लष्कराने अतुलनीय शौर्य दाखवत पाकिस्तानात घुसून तेथील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले, आणि दहशतवादाच्या बाबतीत भारताची शून्य सहनशीलता आहे हे सिद्ध देखील केले. भारताच्या या कृतीचे जगाच्या पाठीवर सर्वत्र कौतुक होत असताना देशातील काही नेत्यांची पोटदुखी मात्र बळावली होती. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या काही निराधार वक्तव्यांचा फायदा घेत काँग्रेसच्या काही नेत्यांनी सुरू केलेला अपप्रचार आणि महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांच्या काही नेत्यांची अस्तित्वातच नसलेली कर्तबगारीची रेषा ठळक करण्याची सुपारी घेत मोदी यांच्यावर टीका करणाऱ्या नेत्यांची ती पोटदुखी अजूनही बरी झालेली नाही. तसे नसते, तर ऑपरेशन सिंदूरच्या वर्षपूर्तीदिनी पुन्हा मोदी यांच्या नावाने गरळ ओकण्याची दुर्बुद्धी ठाकरे गटाच्या प्रवयांस झालीच नसती. ही कारवाई संपूर्ण यशस्वी झाल्याने भारताने कोणाच्याही दबावाखाली नव्हे, तर स्वबळाची पुरेपूर जाणीव करून दिल्यानंतर स्वतःहून थांबविली, असे भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी निःसंदिग्धपणे स्पष्ट केले असतानाही, त्या कारवाईवर पुन्हा प्रश्नचिन्ह उमटवून या प्रवयाने केवळ सरकारच्या नव्हे, तर लष्कराच्या क्षमतेवरही शंका व्यक्त केली आहे. आपले उद्दिष्ट यशस्वीपणे साध्य करून व पाकिस्तानसह संपूर्ण जगाला आपल्या क्षमतांची जाणीव करून देऊन लष्करी कारवाई स्थगित करण्याच्या निर्णयावर ट्रम्प यांच्यासारख्या उतावळ्या नेतृत्वाच्या तत्पुरत्या वक्तव्याचा आधार घेऊन घाईघाईने टिपणी करण्याचा उतावीळपणा तेव्हाही याच देशातील विरोधकांनी केला, आणि आज ऑपरेशन सिंदूरच्या पराक्रमी कारवाईच्या वर्षपूर्तीच्या दिवशीही त्याच असूयेतून गालबोट लावण्याचे प्रयत्न सुरू झाले. पाकिस्तानी दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करण्याच्या भारताच्या मर्यादित कारवाईचे महत्व जगाला पटवून देण्यासाठी विदेशांत सर्वपक्षीय शिष्टमंडळे एकमुखाने या कारवाईचे आणि भारताच्या सर्वश्रेष्ठ युद्धनीतीबरोबरच राजनीतीचे समर्थन करत असताना विरोधी पक्षांचे काही नेते मात्र मोदी यांच्या नेतृत्वास दूषणे देत होते, तेव्हाही जनतेने त्यांच्या या मानसिकतेची खिल्ली उडविली होती. आता पुन्हा त्याच मानसिकतेतून सुरू असलेले प्रयत्न म्हणजे, निर्जीव पिपाण्यांतून विरोधाचे सुरू फुंकण्याचा केविलवाणा प्रकार आहे. राष्ट्राच्या अस्मितेच्या मुद्द्यावर राजकारण करण्याच्या या प्रयत्नांना जनतेचा प्रतिसाद मिळणार नाही, हे कळेल, तेव्हा कर्तबगारीच नव्हे, तर अस्तित्वाच्या रेषादेखील पुसल्या गेलेल्या असतील, याची जाणीव या नेत्यांनी ठेवायला हवी. आपल्या देशाचा सर्वोच्च नेता हा पराभूत मनोवृत्तीचा आहे, हा अपप्रचार प्रस्थापित करण्याच्या राजकारणाचे पितळ आता उघडे पडत चालले आहे. सातत्याने होणाऱ्या निवडणुकांमध्ये जनता नाकारत असताना व जनतेच्या मान्यतेची निर्विवाद मोहोर मोदी यांच्या नेतृत्वावर उमटत असताना असा कोतेपणा दाखवून या नेत्यांनी आपल्या कर्तबगारीच्या पुसल्या गेलेल्या क्षमता दाखवून दिल्या आहेत.**

# कोळी बांधवांसमोरील आव्हाने अन् समस्या

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर



महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम किनारपट्टी व अरबी समुद्रात आपल्या उदरनिर्वाहासाठी मासेमारी करणारा कोळी बांधव विविध पारंपारिक व आधुनिक पद्धतीने मासेमारी करुन आपला व आपल्या देशाचा परकीय चलनाच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रयत्न करीत आहे. परकीय चलनाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासात हातभार लावीत आहे, परंतु आजही कोळी बांधवांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मालकीची जागा नसणे, इंधन परतावा, मासळी सुकाविण्याच्या सुविधांचा अभाव, मासळीचा दुष्काळ या व इतर काही समस्या आहेत.

मुख्य समस्या आहे ती स्वमालकीच्या जागेची. मालकीची जागा नसल्यामुळे कोळी बांधवाना अनेक शासकीय योजनानाचा लाभ घेता येत नाही. मासेमारी व्यवसायाचा कृषीमध्ये समाविष्ट केले आहे, परंतु शेतकऱ्यांप्रमाणे त्यास विकास योजना प्राप्त होत नाहीत. शेतकऱ्यांप्रमाणे त्याच्या कार्यक्षेत्रात ७/१२ नाही तसेच मासळी वाळविणे, निवडणे, साठविणे आदींसाठी असलेल्या जागेचा शेकडो वर्षांपासून ७/१२ नाही. त्याचप्रमाणे त्याच्या निवासासाठी असलेल्या घराच्या जागेचा कित्येक ठिकाण ७/१२ त्याच्या नावावर नाही. त्यामुळे व्यवसायासंबंधी व इतर शासकीय योजनांचा लाभ कोळी बांधवास मिळत नाही. अरबी समुद्राच्या किनारपट्टीलगत कोळी बांधव अनादी काळापासून वास्तव्य करून व्यवसाय करीत आहे, परंतु या पिढ्यान् पिढ्या वापरात असलेल्या जागेचा ७/१२ त्यांच्या मालकीचा नाही. समुद्रालगतच्या जागेचा ७/१२ मच्छीमारांच्या नावे झाल्यास त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येईल.

कित्येक औद्योगिक प्रकल्प त्यांचा घनकचरा, रसायनयुक्त सांडपाणी समुद्रात सोडतात. त्यामुळे किनाऱ्यालगत तसेच खोल समुद्रात माशांच्या पैदासीवर घातक परिणाम होत आहे. उत्पादनात घट होत आहे. पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांचा व्यवसाय दिवसेंदिवस डबघाईला आला आहे. अत्याधुनिक मासेमारी करण्याचा प्रयत्न करीत असताना अनेक कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

केंद्र सरकार व शासनाच्या विविध खाती महाराष्ट्र शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अंतर्गत आहेत. कृषी विभाग केंद्र सरकारकडे महाराष्ट्र शासनाकडे तसेच जिल्हा परिषदेकडे आहे. त्याचप्रमाणे पशुसंवर्धन, आरोग्य असे कित्येक विभाग आहेत, मात्र मत्स्यव्यवसाय विभाग जिल्हा परिषद किंवा स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, नगर परिषद यांचे अंतर्गत नसल्यामुळे अनेक शासकीय योजनांचा लाभ ग्रामीण भागास मच्छिमारांस मिळत नाही. ग्रामीण भागातील मच्छीमार, पाणीपट्टी, घरपट्टी नित्यनियमाने भरीत असतो. जिल्हा परिषद ही ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणकारी योजना लाभ देण्यासाठी असते. जिल्हा परिषदेमधील सेस फंड हा ग्रामीण योजना राबविण्यासाठी वापरला जातो. हा फंड बांधकाम विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग परंतु मत्स्यविभाग हा जिल्हा परिषदेला नसल्यामुळे ग्रामीण भागातील मच्छीमार जिल्हा परिषदेच्या योजनांपासून वंचित राहिला आहे.

जाळी विणणे, दुरुस्त करणे यासाठी मच्छी विक्री केंद्र शेड नाही. अशा काही समस्या आहेत. मे महिन्यामध्ये मासेमारी ही पूर्णतः बंद केली जाते व साधारणतः सप्टेंबरच्या दरम्यान नवीन मासेमारी करण्यास सुरुवात होते. तीन महिने बोटी बंद असल्याकारणाने कुठलीही मासेमारी करता येत नसल्याने उत्पन्नाचे साधन नसते.

शेतकऱ्यांना दुष्काळ भरपाई व पंचनामे करून तत्काळ मिळतो. या तत्वावर मच्छीमार बांधवांना सतत तीन वर्ष दुष्काळ झाला तरच दुष्काळ भरपाई मिळते. शासनाने शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांनाही शेतीचा दर्जा दिलेला आहे. हा तीन वर्षाचा दुष्काळासंदर्भातील कार्यकाल शासनाकडून रद्द करून शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमार बांधवांनासुध्दा दुष्काळ भरपाई तत्काळ मिळावी, अशी मागणी होत आहे त्याचा विचार शासनाने केला पाहिजे.

समुद्रात मिळालेली ताजी मच्छी सगळीच विकली जात नाही. ही सुकवलेली मासळी विकली जाते. अलिबाग तालुक्यातील अलिबाग कोळीवाडा, वरसोली समुद्रकिनारा, नवगाव, बोडणी, रेवस, आग्राव कोळीवाडा, मुरुड तालुक्यातील मुरुड कोळीवाडा, एकदरा, कोर्लई, बोर्ली, उरण तालुक्यातील करंजा, मोरा, बेलपाडा, श्रीवर्धनमध्ये दिवेआगर, श्रीवर्धन कोळीवाडा येथे मोठ्या प्रमाणात मासळी सुकविण्यात येते. बोंबिल, आंबाड, जवळा, कोळंबी, मांदेली, बांगडा, माकूल, मांदेली, बगा, वागटी, ढोमा आदी छोट्या माश्याबरोबरच मोठे मासेदेखील सुकवले जातात. सुक्या मासळीच्या व्यवसायावर रायगड जिल्ह्यातील हजारो कुटुंबांचा चरितार्थ चालतो. सुक्या मासळीच्या व्यवसाय करणाऱ्यांच्यादेखील समस्या आहेत.

मासेमारीला ऑगस्ट महिन्यात सुरवात होते. याच महिन्यात मासे जास्त मिळतात, परंतु पाऊस असल्यामुळे ऑक्टोबर महिन्यापर्यंत मासे सुकवता येत नाहीत. त्यामुळे नुकसान होते. पावसाळ्यातदेखील मासे सुकवता येतील अशा सुविधा शासनाने उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

## क्रांतिकारक वासुदेव हरी चापेकर



आपल्या इतिहासात डोकावून पाहिले असता या मातृभूमीसाठी, देशासाठी मृत्यूला हसत हसत कवटाळणाऱ्यांची परंपरा दिसते. अगदी छत्रपती संभाजी महाराजांनी पापी औरंग्याने दिलेल्या शारीरिक वेदना सहन करत मृत्यूला जवळ केले. त्यांनी एक प्रकारे पुढच्या पिढ्यांना हे उदाहरण घालून दिले की देशापुढे जीवन मृत्यू याचे काहीही मोल नाही असे वाटते, कारण त्यानंतरच्या आपल्या देशाच्या इतिहासात, स्वातंत्र्य लढ्यात अशी उदाहरणे सापडतात. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, बाबू गेनू आणि अशी अनेक. त्यातीलच एक नाव चापेकर बंधू. आज दिनांक ८ मे याच दिवशी १८९९ साली चापेकर बंधूनी मृत्यूला जवळ केले.

२२ जून १८९७ हा दिवस इंग्रजांविरुद्ध सुरु असलेल्या लढ्यातला एक महत्वपूर्ण दिवस ठरला. रँडने पुण्यात प्लेग च्या बहाण्याने अनन्वित अत्याचार केले जे आपल्या कल्पनेपलीकडचे आहेत. अशा या रँडला संपवणे गरजेचे होते. याच दिवशी रँडला पुण्यातील गणेशखिंडीजवळ गाठून त्याच्या बग्गीमध्ये घुसून या बंधूनी त्याचा वध केला.

पुढे चापेकर बंधूना कैद झाली. खटला चालवला गेला अखेर जे व्हायचे तेच झाले. या सर्वांना फाशी ठोठावण्यात आली. ८ मे १८९९ ला वासुदेवराव यांना, १० मे रोजी रानडे यांना, १२ मे ला बाळकृष्णरावांना फाशी देण्याचे नक्की झाले. ७ मे रविवार १८९९ हा दिवस देखील वासुदेवराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नित्य व्यवहार करीत दिवस घालवला. कोणत्याही प्रकारचे मृत्यूचे भय त्यांच्या मनाला शिवले नाही. स्वस्थ झोप घेतली त्या रात्री मात्र १ वाजता उठून प्रार्थना केली. पहाटे पर्यंत प्रार्थना, भगवद्गीतेचे वाचन इत्यादी केले. ७च्या सुमारास त्यांना वधस्तंभाकडे नेण्याकरिता अधिकारी आले. शेवटपर्यंत हातात ठेवण्यासाठी गीतेची प्रत वासुदेवरावांनी घेतली. नीच इंग्रज अधिकाऱ्यांनी या अखेरच्या क्षणीही त्यांची त्यांच्या वडील बंधूंशी गाठ होणार नाही यासाठी बापूराव यांना कोठडीत डांबून ठेवले गेले. परतू त्यांच्या कोठडीवरून जाताना वासुदेवरावांनी बाहेरूनच बापू मी जातो, असे म्हटले. आतूनही रामराम असे शब्द आले. वासुदेवरावांना डिवचण्यासाठी ते इंग्रज अधिकारी त्यांच्या नंतर पुढे सगळे संपेल अशा अर्थी काही म्हणाले. त्यावर त्यांनी उत्तर दिले आम्ही पाच जण फक्त जात आहोत. अजून एकशेपाच बाकी आहेत. त्यांना वध स्तंभाकडे नेत असताना त्यांचे धैर्य पाहून आणि चेहेऱ्यावर जराही भय नसलेले पाहून इंग्रज अधिकारीदेखील स्तंभित झाले. ठीक ७च्या ठोक्याला वासुदेवराव चापेकर यांना फाशी देण्यात आली. ८ मे १८९९ रोजी देशासाठी फासावर जाणाऱ्या वासुदेव हरी चापेकर यांची आज पुण्यतिथी. त्यांना त्रिवार प्रणाम.

**–उमेश जोशी**

## बदलते तंत्रज्ञान



### ऑनलाईन शॉपिंगमध्ये फसवणूक झालीय? हे करा..!

सध्याच्या डिजिटल युगात एका क्लिकवर हवं ते सामान घरपोच मिळतं, पण याच सोयीसोबत ऑनलाईन फसवणुकीचे संकटही वाढलं आहे, पण आता घाबरण्याची गरज नाही! बँकिंग सिस्टममधील 'चार्जबॅक' ही एक अशी शक्कल आहे, जिच्या मदतीने तुम्ही तुमचे कष्टाचे पैसे व्याजासह परत मिळवू शकता.




चार्जबॅक म्हणजे ग्राहकाला मिळालेले एक सुरक्षा कवच आहे. जर तुमच्या बँक खात्यातून पैसे कट झाले असतील. पण त्याबदल्यात तुम्हाला योग्य सेवा किंवा वस्तू मिळाली नसेल, तर तुमची बँक मर्चंटच्या (विक्रेत्याच्या) बँकेकडून ते पैसे परत मागू शकते. ही सुविधा प्रामुख्याने क्रेडिट आणि डेबिट कार्ड वापरकर्त्यांसाठी उपलब्ध असते.

तुमच्या परवानगीशिवाय खात्यातून पैसे कापले गेल्यास, पैसे कापले पण ऑर्डर डिलिव्हर झाली नसेल तर, मागवलेली वस्तू पूर्णपणे वेगळी, खराब किंवा बनावट निघाली तर, दुकानाने रिफंड देण्याचे मान्य करूनही पैसे परत दिले नसल्यास चार्जबॅकचा फायदा मिळतो.

**पैसे परत मिळवण्यासाठी काय करावे?**

१. बँकेला तात्काळ कळवा : फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सर्वात आधी तुमच्या बँकेच्या हेल्पलाईनवर फोन करा किंवा मोबाईल ॲपद्वारे व्यवहार 'डिस्प्युट' म्हणून मार्क करा. तक्रार केल्यावर 'सर्व्हिस रिक्वेस्ट नंबर' घ्यायला विसरू नका.

२. पुराव्यांची जुळवाजुळव : तक्रार करताना तुमच्याकडे पेमेंटची पावती, ऑर्डर कन्फर्मेशनचा ईमेल आणि चुकीच्या वस्तूचे फोटो असणे आवश्यक आहे.


३. फॉर्म भरा : बँकेकडून चार्जबैक किंवा डिस्प्युट फॉर्म मागवून घ्या. त्यात व्यवहाराची तारीख, रक्कम आणि तक्रारीचे नेमके कारण स्पष्ट करा. बँक या पुराव्यांच्या आधारे तपास करते आणि काही आठवड्यांत तुमचे पैसे परत मिळवून देते.

रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, असा कोणताही फसवणुकीचा व्यवहार झाल्यापासून १२० दिवसांच्या आत तक्रार करणे अनिवार्य आहे. जितक्या लवकर तुम्ही पाऊल उचलाल, तितक्या लवकर पैसे मिळण्याची शक्यता जास्त असते.

बँकेला सांगण्यासोबतच सरकारच्या १९३० या राष्ट्रीय हेल्पलाईन नंबरवर कॉल करा किंवा cybercrime.gov.in या पोर्टलवर तक्रार नोंदवा.

# मुक्तछंदाचे प्रवर्तक कवी अनिल

**निमित्त**



प्रसिद्ध कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल यांचा आज स्मृतिदिन. कवी अनिल यांचे मराठी कवितेच्या वाटचालीप्रमाणेच अपारंपरिक शिक्षण क्षेत्रातही भरीव योगदान आहे. त्यांचा जन्म ११ सप्टेंबर १९०१ रोजी विदर्भातील मूर्तिजापूर येथे झाला. शालेय शिक्षण अमरावती येथील हिंदू हायस्कूलमधून झाले. ते १९१९ साली पुण्यात आले. वऱ्हाडात पांढरपेशा समाजामध्ये शिक्षणासाठी पुण्याला फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेण्याची चढाओढ असे. अनिल यांनी मॅट्रिकची परीक्षा अलाहाबाद येथून उत्तीर्ण केली होती.

तत्त्वज्ञान हा विषय घेऊन ते पुण्याहून बीए (१९२४) झाले. पुढे, त्यांनी कायदे शिक्षणाचे धडे घेतले. ते एलएलबी १९२५ साली झाले आणि त्यांनी अमरावतीला वकिली सुरू केली. त्यातूनच त्यांना होशंगाबाद (मध्य प्रदेश) येथे न्यायाधीश म्हणून नियुक्ती मिळाली. अनिल यांच्या आवडीचे विषय पुरातत्त्व, शिल्प, संगीत आणि तत्त्वज्ञान हे होते. मध्यंतरीच्या काळात, त्यांनी कोलकाता येथील शांतिनिकेतनात नंदलाल बोस यांच्याकडे भारतीय चित्रकलेचाही अभ्यास केला.


अनिल यांच्या काव्यलेखनास १९३० साली प्रारंभ झाला. त्यांचा 'फुलवात' हा पहिला कवितासंग्रह १९३२ साली प्रसिद्ध झाला. 'फुलवात'ने मराठी साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेतले. तेव्हा 'रविकिरण मंडळा'तील कवींचा बोलबाला मराठीत विशेषत्वाने होता. त्यांच्या कवितेमध्ये पांडित्यपूर्ण, संस्कृतप्रचुर शब्दकळा, प्रसंगोपातता, शब्दालंकार, यमकादी बंधने यांवर कठोर कटाक्ष असे. त्या पार्श्वभूमीवर अनिल यांचा 'फुलवात' हा संग्रह 'हृदयी लावियली फुलवात' अशा हळुवार ओळी घेऊन बाहेर आला. त्या कवितेचे वेगळेपण आणि वैशिष्ट्य साधी, सरळ व भावस्पर्शी रचना आणि उत्कट गीतात्मता हे ठरले. त्यानंतर तीन वर्षांनी अनिल यांची 'प्रेम आणि जीवन' ही कविता रसिकांपुढे आली.

अनिल यांनी मालवण येथे झालेल्या 'मराठी साहित्य संमेलना'चे अध्यक्षपद १९५८ साली भूषवले होते. त्यांनी कवितेत रचनेच्या अंगानेही प्रयोग केले. ते 'दशपदी' आणि 'मुक्तछंद' या काव्यप्रकारांचे प्रवर्तक होते. त्यांनी कविता मुक्तछंदात असली तरी कवितेचे व्याकरण आणि तालाचे भान सोडले नाही. त्यांच्या 'दशपदी'त दहा चरणांची कविता असे. त्यांना 'दशपदी'साठी 'साहित्य अकादमी' पुरस्कार १९७७ साली मिळाला होता. अनिल यांना १९७९ ची 'साहित्य अकादमी'ची फेलोशिप प्रदान करण्यात आली होती.

अनिल आणि कुसुमावती या सुविद्य दाम्पत्याच्या पत्रव्यवहाराचा संग्रह (कुसुमानिल) प्रसिद्ध आहे. महाविद्यालयीन तरुणांची प्रेमपत्रे, त्यांच्या तत्कालीन भावना, घरचा विरोध आणि त्याला न जुमानता वर उसळी मारून येणारी भावोत्कट प्रेमवृत्ती यांचे तरल व काव्यपूर्ण शब्दांतील चित्रण म्हणून सामाजिक दस्तऐवज या दृष्टीने ती पत्रे महत्त्वपूर्ण वाटतात. ह.वि. मोटे प्रकाशनाने त्यांच्या व अनिल यांच्या अशा निवडकपत्रांचा संग्रह 'कुसुमानिल' शीर्षकाने प्रथम १९७२ साली प्रकाशित केला.

ते पुस्तक 'मराठी अस्मिता' सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे पुनःप्रकाशित करण्यात आले. नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते त्या पत्रप्रपंचाचे पुनर्प्रकाशन नागपूर येथे २ जुलै २०१७ रोजी झाले. अशा या महान कवीचे ८ मे १९८२ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### शहाळ्याची मलई खाल्ल्याने कोलेस्टेरॉल वाढते का?

उन्हाळ्यात शहाळ्याचं पाणी पिणं शरीरासाठी अत्यंत फायदेशीर मानलं जातं. त्यासोबतच अनेकांना शहाळ्याची मऊ, चविष्ट मलई खायलाही खूप आवडते. मात्र आरोग्याची काळजी घेताना मनात एक प्रश्न नेहमी पडतो की, शहाळ्याची मलई खाल्ल्याने कोलेस्टेरॉल वाढतं का? विशेषतः ज्यांना आधीपासूनच कोलेस्टेरॉलची समस्या आहे, त्यांनी ही मलई खावी की टाळावी याबाबत अनेकदा संभ्रम निर्माण होतो.



डाएटिशियन श्वेता जे. पांचाल यांच्या मते, प्रत्येक फॅटयुक्त पदार्थ नुकसानदायक नसतो आणि योग्य प्रमाणात खाल्लेल्या नारळाच्या मलईला घाबरण्याची गरज नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की आपण कोलेस्टेरॉलशी संबंधित योग्य माहिती समजून घेतली पाहिजे आणि आपला आहार संतुलित ठेवला पाहिजे. फूड कोलेस्टेरॉल आणि ब्लड कोलेस्टेरॉलमधील फरक हे समजून घेणे खूप गरजेचे आहे. खाण्यातील कोलेस्टेरॉल आणि रक्तातील कोलेस्टेरॉल हे दोन्ही एकसारखे नसतात. शरीरातील साधारण ८०% कोलेस्टेरॉल लिव्हर स्वतः बनवते, तर फक्त २०% कोलेस्टेरॉल अन्नातून येते. यासाठीच प्रत्येक फॅट्स असलेल्या पदार्थाला नुकसानदायक मानणे योग्य नाही. तुम्ही योग्य प्रमाणात शहाळ्याची मलई खाण्याचा आनंद घेऊ शकता.

डाएटिशियन श्वेता जे. पांचाल यांच्या मते, योग्य प्रमाणांत खाल्लेली शहाळ्याची मलई कोलेस्टेरॉल वाढण्यास कारणीभूत ठरतं नाही. शरीरातील खराब कोलेस्टेरॉल वाढवण्यासाठी अल्ट्रा–प्रोसेस्ड स्नॅक्स : चिप्स, पॅकेज्ड फूड; रिफाईंड कार्ब्स : मैदा, व्हाईट ब्रेड; जास्त साखर असलेले ड्रिंक्स; ट्रान्स फॅट: पॅकेटमधील तळलेले पदार्थ; सतत येणारा ताण या गोष्टी जास्त कारणीभूत ठरतात. या गोष्टींचा परिणाम तुमच्या आरोग्यावर जास्त होतो, शहाळ्याच्या मलईचा नाही. त्यामुळे संतुलित आहार घेणे केव्हाही उत्तम.

नारळ मलईमध्ये हेल्दी फॅट्स असतात, पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही ती जास्त प्रमाणात खाऊ शकता. शहाळ्याची मलई कधीतरी थोड्या प्रमाणात खाणे ठीक आहे. रोज मोठ्या प्रमाणात खाणे टाळा. शहाळ्याची मलई खाण्यासोबतच फळ, भाज्या आणि फायबरचा डाएटमध्ये समावेश करा. शहाळ्याच्या मलईमध्ये हेल्दी फॅट्स असतात. जर तुम्हाला हाय कोलेस्टेरॉल असेल तरीही ती पूर्णपणे बंद करण्याची गरज नाही. संतुलित प्रमाणात खाणे सुरक्षित आहे. कधीतरी थोड्या प्रमाणात खाणे ठीक आहे, पण रोज मोठ्या प्रमाणात खाणं टाळावं.

# राज्यपालांसमोर विद्यापीठाचा विकास आराखडा

## ‘बाटू’च्या बांबू प्रकल्पाची जागतिक मानांकनासह छाप

**माणगाव : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र लोणेरे विद्यापीठचे कुलगुरू प्रा.डॉ.राजनीश कामत यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांची राजभवन येथे भेट घेत विद्यापीठाच्या कामकाजाचे विस्तृत सादरीकरण केले. उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता, नवोन्मेष आणि प्रशासनातील कार्यक्षमता यावर आधारित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर यावेळी सखोल चर्चा झाली.




बैठकीदरम्यान परीक्षा विभाग आणि संलग्नता (Affiliation) विभागातील सध्याची परिस्थिती, विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच त्यावरील उपाययोजना यांचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान आणि विद्यार्थी-केंद्रित करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या सुधारणांबाबत माहिती देण्यात आली. तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीवर विशेष भर देण्यात आला.

विद्यापीठांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानांकन कालबद्ध पद्धतीने उंचावण्यासाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली. संशोधन, उद्योग-सहकार्य, नवकल्पना आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून विद्यापीठाला जागतिक स्तरावर अधिक सक्षम करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांनी विद्यापीठाच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक सुधारणा, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी आणि प्रशासकीय कार्यक्षमता याबाबत प्रभावी मांडणी केली.

बैठकीतील विशेष आकर्षण ठरला तो विद्यापीठाचा ''BAMBOO'' प्रकल्प. बांबूपासून पर्यावरणपूरक, उपयुक्त आणि नाविन्यपूर्ण उत्पादने विकसित करण्याच्या या उपक्रमाबाबत राज्यपालांनी विशेष रस व्यक्त केला. ग्रामीण अर्थव्यवस्था, शाश्वत विकास आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या अशा प्रकल्पांना अधिक प्रोत्साहन देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे आणि सहसचिव एस. राममूर्ती , मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रवींद्र कुलकर्णी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा.डॉ.राजनीश कामत, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुनील भिरूड तसेच मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. अजय भामरे उपस्थित होते.

# करवंद तोडण्यासाठी गेलेल्या मुलीसोबत गैरवर्तनाचा प्रयत्न; आरोपी ताब्यात

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कळंब गरुडपाडा परिसरात सात वर्षीय मुलीसोबत गैरवर्तनाचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी नेरळ पोलिसांनी पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करत १३ वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेत चौकशी सुरू केली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, पीडित चिमुकली आपल्या मामाकडे राहत असून ती आपल्या लहान बहिणीसोबत गावाजवळील माळरानावर करवंद तोडण्यासाठी गेली होती. त्याचवेळी बकऱ्या चारण्यासाठी आलेल्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलाने तिच्या जवळ जाऊन अयोग्य स्पर्श केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

घाबरलेल्या मुलीने घरी परतल्यानंतर हा प्रकार कुटुंबीयांना सांगितला. त्यानंतर कुटुंबीयांनी तत्काळ कळंब पोलिस चौकीत धाव घेत तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नेरळ पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी राहुल वरोटे यांनी तत्काळ कारवाई करत पॉक्सो अंतर्गत गुन्हा नोंदविला.

या प्रकरणात संबंधित अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, मुलगी आणि मुलगा वेगवेगळ्या समाजातील असल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे परिस्थिती सध्या शांत असल्याची माहिती मिळत आहे.

## लायन्स क्लबतर्फे महारक्तदानासह नेत्रचिकित्सा शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

लायन्स क्लब अलिबाग मुरुड व रायगड श्रमिक एकता संघाच्या वतीने संजय माळी यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने महारक्तदान शिबिर आणि मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे थळ पेठ येथे आयोजन करण्यात आले. यावेळी तब्बल २१०बॉटल्स एवढ्या मोठ्या प्रमाणावर रक्त संकलित करून एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे .तर एकूण १०४ नेत्ररुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. त्यापैकी मोतिबिंदूसह ३८ जणांना मोफत शस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आले.थळ ग्रामस्थ, लायन्स सभासद, आरसीएफ कर्मचाऱ्यांसह सी आय एस एफच्या जवानांनीही रक्तदान केले

# रेवदंड्यात भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळ्यात छत्रीचा आधार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात कडक उन्ह डोईवर आले असताना, पारनाका येथील भाजी विक्रेत्यांना सावलीसाठी चक्क छत्रीचा आधारघ्यावा लागतो आहे.

रेवदंडयात भाजी मार्केटचा प्रश्न ऐरणीवर असून संबधीत भाजी मार्केटचा प्रश्न सोडविण्यास चक्क अपयशी ठरले आहेत. गेलेअनेक वर्ष भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळ्यांत सावलीसाठी तर पावसाळयात पाऊसापासून बचाव करण्यासाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावालागतो आहे. सध्यस्थितीत ऐन उन्हाळयात कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी भाजी विक्रेते छत्री उघडून भाजी विक्री व्यवसाय करीतआहेत.

रेवदंडा शहर मध्यवर्ती ठिकाण असल्याने आजूबाजूच्या पंचक्रोशीतील भाजी विक्रेते व्यवसायासाठी ताजी भाजी उपलब्ध करीतअसतात, ताजी भाजीसह कडधान्ये, चिंच, आंबे, सफेद कांदे, कलिगंडे आजूबाजूच्या बागायतीमधील विविध फळे पारनाका येथील भाजीविक्रेत्यांकडे उपलब्ध असते, सकाळचे कोवळे उन्ह सरताच उन्हाळयातील कडक सुर्य किरणे डोक्यावर पडताच सहन होत नाही, अश्यापरिस्थितीत भाजी,फळे, कडधान्य आदीचा व्यवसाय साधणे फार जिकीरीचे कठीण बनते. पंचक्रोशीतून भाजी



मार्केट मध्ये खरेदी ग्राहक येतअसतात त्यांना सुध्दा ऐन उन्हात खरेदी करावी लागते.भाजी मार्केटचा प्रश्न अनेक वर्ष रेंगाळत राहीला असून संबधीत गांर्भियांने पाहत नाही.

रेवदंडा शहरात अनेक वर्ष भाजी मार्केट सुविधा नाही, त्यामुळे भाजी विक्रेत्यासह खरेदीदारांना सुध्दा उन्हाळयात व पावसाळयातत्रास सहन करावा लागतो. भाजी मार्केट प्रमाणे मच्छी मार्केटचा सुध्दा प्रश्न नित्यांने निर्माण करतो आहे. रेवदंडा हायस्कुलच्या बाजूच्या गल्लीत तसेच आत गल्लीत मच्छी विक्री व्यवसाय केला जात आहे. या ठिकाणी नित्याने बाहेरील वाहनांची कोंडी होते तर रेवदंडासमुद्र किनारी ये-जा करताना पर्यटकांना सुध्दा अडथळा निर्माण होतो.रेवदंडयातील भाजी मार्केट व मच्छी मार्केट हे जिव्हाळयाचे प्रश्न केव्हा सुटणार असा प्रश्न ग्रामस्थ करत आहेत.


**पनवेल महानगरपालिका**
तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड
**पर्यावरण विभाग**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा उपक्रम राबविणेसाठी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेसाठी आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून जाहीर सूचनेद्वारे बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत.
सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा.क्र/पमपा/पर्या./३४२६/
प्र.क्र.०२/२५/२०२६
दिनांक:- ०७/०५/२०२६

**(सही/-)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे-वलप, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| भूमापन क्रमांक/ उपविभाग नंबर | क्षेत्रफळ हे.आर. चौ.मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२४/१ | ०-८३-२० पो.ख. ०-००-०० **एकूण ०-८३-२०** | ४.८० | सुधिर रामचंद्र तरेदेसाई |

वरील मिळकतीचे एकूण क्षेत्र **०-८३-२० हे. आर. चौ. मी. पैकी सुधिर रामचंद्र तरेदेसाई यांचे अविभाज्य हिश्याचे एकूण क्षेत्र ०-६७-२० हे. आर. चौ. मी.**, आकार ३.८८ रू. पैसे पैकी विक्री क्षेत्र ०-४० -०० हे. आर. चौ. मी. या मिळकतीचे संमतीपत्र.

पनवेल.
दिनांक : ०७/०५/२०२६.

**सही / -**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
ॲडव्होकेट
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारासमोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.



**जाहीर नोटीस**

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, : मौजे नढाळ ता. खालापूर, जिल्हा रायगड येथील खालील प्रमाने हक्क नोंदीस वर्णन असलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित जमिन मालक श्री. मनजी रणछोड दुबरीया यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे नं. | क्षेत्रफळ. आर.चौ.मी. | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | १९/१ | १३०.०० | १०३०.०० |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व. कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तकार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : रिस
दिनांक: ०७/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. सचिन चाळके**

कार्यालय : गोकुळ नगरी बिल्डींग, पहिला माळा, रुम नं. १०७, रिस गाव , पोस्ट मोहोपाडा, जिल्हा रायगड-४१०२२२. मो. ८१८०८२३०४०
Email : srchalke1979@gmail.com


## मुरूड-धुळे ‘लाल परी’चे आरक्षण पूर्ववत करावे

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड आगारातून प्रवाशांच्या सेवेसाठी लांब पल्ल्याच्या बसेस सोडल्या जात असुन धुळे , शिर्डी , लातूर , गहिनीनाथ नगर , तुळजापूर आदी गाड्यांचा समावेश आहे . या सर्व गाड्यांमध्ये धुळे गाडीचे भारमान सर्वात जास्त असून सिझन मध्ये ४० ते ४१ हजार उत्पन्न देणारी ही लालपरी असल्याची माहिती आहे . २०१२ मध्ये सुरु झालेली ही बस जेएसडब्लु , शासकीय निम शासकीय कर्मचारी तसेच नासिक, धुळे , मालेगाव , सटाणा , नंदुरबार आदी पूर्व खानदेश भागातील हौशी पर्यटकांना अत्यंत सोयीची आहे .

परंतु ऐन हंगामात मुरुड आगारा कडुन आरक्षण सुविधा मध्येच सुरु करणे , मध्येच बंद करणे हा प्रकार सुरू करून प्रवाशांना धक्का तंत्र देण्याची योजना बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीद्र वाक्याला छेद देणारी आहे .

दिनांक ४ मे पासून आरक्षण चार्ट मधुन धुळे गाडी ला वगळले असून प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी दिसून येत आहे.

आरक्षण मध्येच कां बंद केले याचा समाधानकारक खुलासा नियंत्रण कक्षा मधुन न मिळाल्याची तक्रार ज्येष्ठ नागरीक बळीराम जाधव नासिक यांनी केली .मुरुड या पर्यटन स्थळी लांब पल्ल्याचा प्रवास सुखकर होण्यासाठी विभागीय नियंत्रक यांनी या विषयात लक्ष घालून आरक्षण सुविधा पूर्ववत करून या मार्गावरील प्रवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी मुरुड माधिल नागरिकां कडुन करण्यात येत आहे .


**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल**
**४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड**
**ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com**

**लिलाव विक्री सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना **मागणी सूचना** जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियनांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/ जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या १०% ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रियेश पांडुरंग कांगी (कर्जदार), सौ. राजश्री प्रियेश कांगी (कर्जदार), श्री. अरूण नारायण म्हात्रे (जामीनदार), श्री. आशिष भगवान दरे (जामीनदार) | श्री. प्रियेश पांडुरंग कांगी आणि सौ. राजश्री प्रियेश कांगी यांच्या नावे असलेले घर क्र. १२१८ए (पनवेल महानगरपालिका पनवेलच्या कार्यक्षेत्रामधील), क्षेत्रफळ ९०० चौ.फू., मु. कामोठे, तालुका पनवेल, जि. रायगड. | २१.०४.२०२५ आणि ३१.०३.२०२५ रोजीनुसार रु. ३५,१८,७७२.०० अधिक ०१.०४.२०२५ पासून चे पुढील व्याज | रु. ३६,००,०००/- (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार “नाही”.) | रु. ३,६०,००० | ०२.०६.२०२६ आणि स. ११.०० ते दु. ०१.०० |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता “जसे आहे जेथे आहे तत्त्वावर” आणि “जसे आहे जे आहे तत्त्वावर” फक्त लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. लिलाव **‘जसे आहे जेथे आहे तत्त्वावर’ आणि ‘जसे आहे जे आहे तत्त्वावर’, ‘तेथे जे आहे’ आणि ‘कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर’** आयोजित करण्यात येईल आणि “ऑफलाईन” करण्यात येईल.

२. “**श्री. प्रियेश पांडुरंग कांगी आणि सौ. राजश्री प्रियेश कांगी यांच्या नावे असलेले घर क्र. १२१८ए (पनवेल महानगरपालिका पनवेलच्या कार्यक्षेत्रामधील), क्षेत्रफळ ९०० चौ.फू., मु. कामोठे, तालुका पनवेल, जि. रायगड** या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव” असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी **दि. ८ जून, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.

३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. १० जून, २०२६** रोजी उपरोल्लेखित ठिकाणी **सायं. ०४.०० वाजता** उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.

४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.

५. लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तींच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तींच्या अधीन आहे.

६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.

७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.

९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे **दि. ०८ जून, २०२६ रोजी** किंवा त्यापूर्वी पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.

१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.

११. किमान बोली विस्तार रक्कम **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार)** आहे.

१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.

१३. बोलीदार “कॅव्हेट एम्प्टर” (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.

१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.

१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.

१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.

१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.

१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.

१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा **‘जसे आहे जेथे आहे’ आणि ‘जसे आहे जे आहे’, ‘तेथे जे आहे’** आणि ‘कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर’ लिलाव करण्यात येईल.

२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.

२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**ठिकाणः पनवेल, जि. रायगड**
**दिनांकः ०८.०५.२०२६**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**



**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल**
**४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड**
**ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com**

**लिलाव विक्री सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना **मागणी सूचना** जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियनांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या १०% ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी (कर्जदार/ गहाणखतदार), सौ. शलाका निवृत्ती कोळी (कर्जदार/ गहाणखतदार), श्री. राज एकनाथ कोळी (जामीनदार), श्री. दीपक बंडू कोळी (जामीनदार), श्री. निलेश अरूण खाडे (जामीनदार) | श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी आणि सौ. शलाका निवृत्ती कोळी यांच्या नावे असलेले घर क्र. २०९४, गाव गव्हाण तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ८४१ चौ.फू. | १२.११.२०२४ आणि ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. २५,७९,०६७/- अधिक ०१.११.२०२४ पासून चे पुढील व्याज | रु. १८,५०,२००/- (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार “नाही”.) | रु. १,८५,०२० | ०३.०६.२०२६ आणि स. ११.०० ते दु. ०१.०० |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता “जसे आहे जेथे आहे तत्त्वावर” आणि “जसे आहे जे आहे तत्त्वावर” फक्त लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. लिलाव **‘जसे आहे जेथे आहे तत्त्वावर’ आणि ‘जसे आहे जे आहे तत्त्वावर’, ‘तेथे जे आहे’ आणि ‘कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर’** आयोजित करण्यात येईल आणि “ऑफलाईन” करण्यात येईल.

२. “**श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी आणि सौ. शलाका निवृत्ती कोळी यांच्या नावे असलेले घर क्र. २०९४, गाव गव्हाण तालुका पनवेल, जिल्हा रायगड. ८४१ चौ.फू.** या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव” असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी **दि. ८ जून, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.

३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. १० जून, २०२६** रोजी उपरोल्लेखित ठिकाणी **दु. ०३.०० वाजता** उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.

४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.

५. लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तींच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तींच्या अधीन आहे.

६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.

७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.

९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे **दि. ०८ जून, २०२६ रोजी** किंवा त्यापूर्वी पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.

१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.

११. किमान बोली विस्तार रक्कम **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार)** आहे.

१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.

१३. बोलीदार “कॅव्हेट एम्प्टर” (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.

१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.

१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.

१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.

१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.

१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.

१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा **‘जसे आहे जेथे आहे’ आणि ‘जसे आहे जे आहे’, ‘तेथे जे आहे’** आणि ‘कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर’ लिलाव करण्यात येईल.

२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.

२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**ठिकाणः पनवेल, जि. रायगड**
**दिनांकः ०८.०५.२०२६**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

# वाशी गावातील विकासकामांना मिळणार गती

## आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी बुधवारी वाशी गाव परिसराला भेट देऊन विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. नगरसेवक निशांत भगत यांनी वाशी गावातील स्थानिक नागरिकांच्या विविध मागण्या आणि पायाभूत सुविधांच्या आवश्यकतेबाबत आयुक्तांना सविस्तर माहिती दिली. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन शहरातील उपाययोजना करणे, हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश होता. यावेळी आयुक्तांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

पायाभूत सुविधा व वाहतूक सुधारणाः वाशी गावातील जुन्या भुयारी मार्गाची सुधारणा करून तो नागरिकांच्या वापरासाठी अधिक सुलभ करण्यात यावा. तसेच, सायन–पनवेल महामार्गावरील वाढती वाहतूक विचारात घेऊन अंतर्गत वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने 'सर्व्हिस रोड' उभारण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

नवीन मार्केट व सुविधाः ग्रामस्थांची आणि महिलांची गैरसोय टाळण्यासाठी गावात सुसज्ज 'मच्छी व भाजी मार्केट' उभारण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. यामुळे अनधिकृत फेरीवाल्यांना आळा बसून स्थानिक कोळी महिला आणि व्यापाऱ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध होऊन नागरिकांना पदपथांचा वापर करता येईल, परिसर स्वच्छ व सुगंधी राहिल व वाहतूक कोंडीतून सुटका होईल.

पर्यावरण आणि सुशोभीकरणः सायन–पनवेल हायवेला लागून एक नवीन उद्यान (गार्डन) विकसित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे परिसरातील हरित क्षेत्र वाढण्यास मदत होईल. तसेच, नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील प्रत्येक गावात 'सुगंधी अंगण अभियान' अधिक प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना आयुक्तांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.या दौऱ्यामुळे वाशी गाव परिसरातील पायाभूत सुविधा अधिक चांगल्या होणार असल्यामुळे प्रशासनाच्या तत्परतेबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

> लोकहिताच्या कामांना गती देऊन नवी मुंबईला अधिक सुविधासंपन्न आणि स्वच्छ, सुगंधी बनवण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे. नागरिकांच्या सुरक्षेला आणि सोयींना आमचे सर्वोच्च प्राधान्य राहील.
>
> – **डॉ. कैलास शिंदे,**
> आयुक्त, नमुंमपा

# भूखंडाचे आमिष दाखवून ५७ लाखांची फसवणूक

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील मोकळे भूखंड विकत देण्याचे आमिष दाखवून एका टोळीने १५ गुंतवणूकदारांकडून तब्बल ५७ लाख ३६ हजार रुपये उकळले आहे . त्यांना प्लॉट अथवा त्यांची रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सीबीडी बेलापूर पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी तेजस डाकी व त्याच्या इतर साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणातील टोळीने जून २०२२मध्ये सीबीडी परिसरात मे. लँडलॉर्डस् रिअलटर्स या कंपनीचे कार्यालय सुरू केले होते. त्यानंतर त्यांनी उरण तालुक्यांतील विंधणे , वशेणी व पुनाडे या भागातील मोकळे प्लॉट विकत देण्याची जाहिरातबाजी केली होती. या जाहिरातबाजीला भुलून अनेक गुंतवणूकदारांनी या कंपनीकडे धाव घेतली. आरोपींनी या गुंतवणूकदारांकडून प्लॉटच्या मोबदल्यात मोठी रक्कम घेतली. मात्र, पैसे घेऊनही आरोपींनी प्लॉटचा दिला नाही आणि गुंतवणूकदारांचे पैसेही परत केले नाहीत.त्यामुळे गुंतवणूकदारांची मोठया प्रमाणात फसवणूक झाली.

या प्रकरणात फसवणूक झालेल्यांमध्ये पुष्करसिंग रावत याच्यासह प्रवीण चंदनशिव, प्रदीप भाटकर, सुनील वाडकर, कांतीलाल पटेल, गौरव वरसोलकर, राजिंदर सिंग, हफिज अन्सारी, मनोज होळकर, नानी मंडल, तुकाराम ढेपे, सचिन शहाणे, सुनील शेट्टी व इतरांचा समावेश आहे. या सर्वांना मिळून ५७लाख ३६ हजार रुपयांचा गंडा घालण्यात आला असून या १५ गुंतवणूकदारांनी एकत्र येऊन सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.आर्थिक फसवणूक करून खोट्या जमीन खरेदी विक्री करणाऱ्या टोळ्या उरण तालुक्यात सक्रिय झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# नवीन जलवाहिन्यांची कामे रखडली

## प्रशासनाच्या अनास्थेमुळे नागरिकांमध्ये संताप

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे भागातील प्रभाग क्र. १२ अंतर्गत येणाऱ्या सेक्टर १७ आणि १८ मधील नागरिक सध्या दूषित पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून येथील रहिवाशांना पिण्यासाठी घाणेरडे पाणी मिळत असल्याने कावीळ, जुलाब, उलट्या आणि पोटाचे गंभीर विकार बळावले आहेत. प्रशासन आणि पालिका यंत्रणेच्या अनास्थेमुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात असल्याचा आरोप होत आहे.

कोपरखैरणे सेक्टर १७ आणि १८ मधील जलवाहिन्या अत्यंत जुन्या आणि सिडकोकालीन आहेत. काळानुसार या वाहिन्यांना मोठ्या प्रमाणावर गंज पकडला आहे. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्या आणि सांडपाण्याच्या (मलनिस्सारण) वाहिन्या समांतर आहेत. गंजलेल्या आणि जीर्ण जलवाहिन्यांच्या छिद्रांतून सांडपाणी मिसळत असल्याने, नळावाटे थेट गटारासारखे पाणी नागरिकांच्या घरात येत आहे.

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून पालिका प्रशासनाकडून नवीन जलवाहिन्या टाकण्यास तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. मात्र, मंजुरी मिळाल्यानंतरही प्रत्यक्षात जमिनीवर काम सुरू होत नसल्याने रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. "प्रशासनाला मोठ्या दुर्घटनेची प्रतीक्षा आहे का?" असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक करत आहेत.

या समस्यांची दखल घेत स्थानिक समाजसेवक वसंत जाधव यांनी पालिका सहाय्यक आयुक्त भरत धांडे यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे. तसेच नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवून तातडीने नवीन जलवाहिन्यांचे काम हाती घ्यावे," अशी मागणी त्यांनी केली आहे.

पाणीपुरवठ्याच्या दर्जाबद्दल बोलताना नागरिक प्रचंड संताप व्यक्त केला आहेः नळाला पाणी आले की सुरुवातीला गटारातील पाण्यासारखा घाण वास येतो. या दूषित पाण्यामुळे आमच्या घरातील सर्वांनाच जुलाब आणि उलट्यांचा त्रास झाला असल्याचे सेक्टर –१८ येथील गृहिणी शीतल शेलार यांनी सांगितले.तर आमच्या असोसिएशनमधील अनेक नागरिकांना पोटाचे विकार जडले आहेत. पाणी शुद्ध नसल्यामुळे लहान मुले आणि वृद्धांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला असल्याचे सेक्टर –१७ येथील नितेश वीर यांनी सांगितले.

# नवी मुंबईत लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात पॅरोलवर असलेल्या आरोपींवर कठोर कारवाईची करा

## शिवसेनेच्या महिला जिल्हाप्रमुख शीतल कचरे यांची मागणी



**नवी मुंबई : बातमीदार**

भोर येथील नसरापूरमध्ये ४ वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अमानुष लैंगिक अत्याचार आणि हत्येच्या घटनेनंतर राज्यभर संतापाची लाट उसळली असताना, नवी मुंबईतील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पुढे आली आहे.

महिला आघाडी जिल्हाप्रमुख शीतल कचरे यांनी नवी मुंबई पोलिस आयुक्तांकडे निवेदन सादर करून, लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आणि सध्या पॅरोलवर असलेल्या आरोपींची पुनर्तपासणी करण्याची मागणी केली आहे.

पॅरोलवर सोडताना घालून दिलेल्या अटी–शर्तींचे पालन होत आहे का याची पोलिसांनी सखोल चौकशी करावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचा पॅरोल रद्द करून त्यांना पुन्हा कारागृहात पाठवावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तसेच अशा गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे का, याची तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. लैंगिक अत्याचारासारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना भविष्यात पॅरोल मंजूर होऊ नये यासाठी संबंधित यंत्रणांनी योग्य अहवाल सादर करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

महिलांचा सन्मान न करणाऱ्या आणि समाजासाठी धोकादायक ठरणाऱ्या अशा आरोपींविरोधात कठोर भूमिका घेण्याची वेळ आली असल्याचे मत शीतल कचरे यांनी व्यक्त केले.

## भक्ती पवार विज्ञान शाखेतून प्रथम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल जाहीर झाला असून या परिक्षेत मोहोपाडा येथील जनता विद्यालय ज्युनिअर कॉलेजच्या विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे .या ज्युनिअर कॉलेजमधून भक्ती सुधीर पवार हि ७२.३३ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे.यावर्षी जनता विद्यालय ज्युनिअर कॉलेज विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.बारावी विज्ञान शाखेतून भक्ती पवार प्रथम आल्याने तिचे ग्रामसुधार मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व मोहोपाडा ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# नवी मुंबईत १८ मे रोजी ग्लोबल बिझनेस समिटचे आयोजन

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईत प्रथमच ग्लोबल बिझनेस समिटचे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि थायलंड यांच्यामधील व्यापार वृद्धीच्या अनुषंगाने हे समिट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बेलापूर येथील पार्क या तारांकित हॉटेल मध्ये १८ मे रोजी ही समिट संपन्न होणार आहे.

थायलंडचे माजी उपपंतप्रधान एच इ कॉर्न दब्बरान्सी, इंजीनियरिंग इन्स्टिट्यूट ऑफ थायलंडचे संचालक तथा PEITA चे सल्लागार प्रो. डॉ. चियांचुंग ओदि कलायांनामित्र, भारतातील थाई दुधावासाचे माजी सदस्य तथा PEITA चे सल्लागार थाराडोल थाँगग्रंग, पंतप्रधान कार्यालयातील फॉरेन अफेयर्स सचिव प्रसर्त पियासाचादेश यांचे शिष्टमंडळ या बिझनेस सबमिटमध्ये थायलंड देशाच्या वतीने उपस्थित राहणार आहे. तूर्तास युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांतील व्यापार वृद्धी हा विषय संपुष्टात आलेला आहे.



होर्मुज समुद्रधुनी रोखून ठेवल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर त्याचे अत्यंत विपरीत परिणाम दिसून येत आहेत. युनायटेड नेशन्स सोबत महत्त्वपूर्ण बिजनेस ट्रेड डील झालेली असली तरी देखील ती अमलात आणण्यासाठी किती वेळ लागेल याचे कुणाकडे शाश्वत उत्तर नाही. व्यवसायाच्या दृष्टीने महासत्ता असणाऱ्या अमेरिकेला सध्या युद्धाची झळ सोसावी लागत असल्या कारणामुळे भारतीय गुंतवणूकदार व्यवसाय वृद्धी करता या देशाकडे देखील सकारात्मक दृष्टीने पाहत नाहीत. चीन सारखा व्यवसाय वातावरण पोषक देश आपल्या शेजारी असून देखील या देशासोबत असणारी विश्वासार्हता ही नेहमीच वादातीत राहिलेली आहे. याच कारणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये व्यवसाय वृद्धी करण्याकरता भारतातील लघु मध्यम आणि मोठे व्यावसायिक योग्य संधीच्या शोधात आहेत. दुसरीकडे थायलंड सारखा देश हा सातत्याने ऐयाशी करण्याकरता प्रसिद्ध राहिलेला आहे. परंतु या देशातील असणाऱ्या व्यवसाय पोषक परिस्थितीचा भारतातील गुंतवणूकदार आणि व्यावसायिक यांना फायदा होऊ शकतो. याच गोष्टीची चाचपणी करण्याकरता दोन्ही देशांतील व्यावसायिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्याकरता यु बिझनेस मीट यांच्यावतीने ग्लोबल समिट २०२६ चे आयोजन करण्यात आलेले आहे.

१८ मे रोजी संपूर्ण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी व्यवसायाचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्टॉलचे आयोजन देखील करण्यात आले आहे. या समितीमध्ये सहभागी होण्याकरता सशुल्क नावे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली असून बुक माय शो च्या माध्यमातून देखील या समितीमध्ये रजिस्ट्रेशन करता येऊ शकेल. रियल इस्टेट, इम्पोर्ट एक्सपोर्ट, बँकिंग, एज्युकेशन, टेक्नॉलॉजी, मेडिकल टुरिझम, लाईफस्टाईल आणि हेल्थकेअर, स्पेशल टुरिझम, स्पिरिचुअल टुरिझम ग्लोबल मीडिया अँड एंटरटेनमेंट या व्यवसाय क्षेत्रांवर प्राधान्य क्रमाने फोकस ठेवण्यात आलेला आहे.

नजीकच्या भविष्यात अशाच पद्धतीच्या व्यवसाय सुलभ पोषक वातावरण असणाऱ्या देशांसोबत बिझनेस समिट आयोजित करण्याचे मानस आहे.

# चिरनेरच्या अमित परदेशी यांना पोलीस महासंचालक पदक



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

महामार्ग सुरक्षा पथक, रायगड परिक्षेत्रामध्ये रायगड कार्यरत असणारे महामार्ग पोलीस मदत केंद्र पळस्पे येथील पोलीस अमंलदार अमित अंकुश परदेशी यांना पोलीस महासंचालक पदक देऊन गौरवण्यात आले.

महामार्ग पोलीस केंद्र, पळस्पे येथे आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे यांच्या हस्ते त्यांना हे मानाचे पदक देऊन गौरविण्यात आले. उरण तालुक्यातील चिरनेर या जंगल सत्याग्रहाच्या लढ्याचा वारसा लाभलेल्या ऐतिहासिक गावातून पोलीस दलात दाखल झालेल्या अमित अंकुश परदेशी यांचा २५ वर्षाचा सेवाकाळ म्हणजे शिस्त आणि कष्टाचा चालता बोलता इतिहास आहे. खाकी वर्दीची आब राखताना, त्यांनी सेवा दरम्यान शिस्तबद्ध व प्रामाणिक कामाचा ठसा उमटविला आहे. केवळ कर्तव्य पालनच नव्हे तर महामार्ग पोलीस दलात कार्यरत असताना, अपघाताच्या प्रसंगी तत्परतेने धाव घेऊन जखमींना वेळेवर मदत मिळवून देत, अनेकांचे प्राण वाचविण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले आहे.

दरम्यान, महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथील एकूण सहा पोलीस अंमलदारांनी केलेल्या अतुलनीय आणि उत्कृष्ट सेवेची दखल घेत त्यांना पोलीस महासंचालक पदक देऊन गौरविण्यात आले आहे. यावेळी महामार्ग सुरक्षा पथक रायगड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, पोलीस उपअधीक्षक पुष्पलता दिघे, पोलीस निरीक्षक भरत शेडगे व म. पो. केंद्र पळस्पे प्रभारी अधिकारी वैभव रोगे यांच्यासह अन्य पोलीस अधिकारी उपस्थित होते.

महामार्ग सुरक्षा पथकातील पोलीस हवालदार अमित परदेशी हे चिरनेर गावात येताच, उद्योगपती राजेंद्र खारपाटील, सामाजिक कार्यकर्ते बी के भगत, सरपंच भास्कर मोकल, चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, चिरनेर गावचे पोलीस पाटील संजय पाटील, शेकापचे चिटणीस सुरेश पाटील, भाजपचे सुशांत पाटील, शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, उपसरपंच दीपक कातकरी, माजी उपसरपंच सचिन घबाडी, माजी उपसरपंच अरुण पाटील व चिरनेर ग्राम पंचायतीच्या सदस्यांसह चिरनेर गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत उद्या जुईनगरमध्ये चर्चासत्र

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बौद्ध समाजाची भूमिका काय असावी ? या बाबत चर्चा सत्राचे आयोजन शनिवार ९मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता जुईनगर सेक्टर २५ येथील मुलगंधकुटी बुद्ध विहार येथे आरपीआय नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष महेश खरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. या चर्चा सत्रात ऍडव्होकेट महेंद्र झाडे आणि प्रवीण मोरे याचे प्रमुख मार्गदर्शन होणार असल्याचे निमंत्रक एल. आर. गायकवाड यांनी कळविले आह.

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती उपवर्गिकरण पुनर्विचार याचिका फेटाळल्या नंतर आता उपवर्गीकरण होणारच हे वास्तव नाकारता येणार नाही. आजपर्यंतचा इतिहास आहे की ,कोणत्याही जाती– धर्मावर अन्याय झाला की बौद्ध समाज अधिक आक्रमक होत रस्त्यावर उतरतो , मात्र आज या जातीवर अन्याय होत असून बौद्धांच्या बाजूने कोण बोलत नाही अशी खंत मुख्य आयोजक महेश खरे यांनी व्यक्त केली आहे.बौद्ध धम्माकडे जाणारा प्रवाह रोकण्यासाठी १९५६ ला धर्मांतरीत बौद्धांचे आरक्षण रद्द केले. आत्ता आरक्षण कमी करण्याचा कट रचला जात आहे. हा जातींमध्ये फूट पाडण्याचा डाव नसून बौद्ध धम्माकडे जाणारा प्रवाह रोकण्याचे षडयंत्र असून यावर खुले चर्चासत्र होणार असल्याचे महेश खरे यांनी सांगितले.

# उन्हापासून संरक्षणासाठी स्वच्छताकर्मींना टोप्यांचे वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या वातावरणातील उष्मा मोठया प्रमाणावर वाढला असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांनी कारणाशिवाय दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडू नये असे आवाहन करण्यात आले आहे. या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शहर स्वच्छतेसाठी सकाळी लवकरच बाहेर पडणाऱ्या स्वच्छताकर्मींच्या आरोग्याची काळजी घेत सर्व स्वच्छताकर्मी व त्यांचे पर्यवेक्षक यांना घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत टोप्यांचे वाटप करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी पिण्याच्या पाण्याची बाटली सोबत ठेवावी व नियमितपणे जास्तीत जास्त पाणी प्यावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभागातील सर्व कंत्राटदारांनी आपल्या स्वच्छताकर्मींची काळजी घ्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.



महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वच्छताकर्मीप्रमाणेच क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या स्थापत्य, पाणी पुरवठा, मलनिःस्सारण, उदयान व इतर विभागातील सर्व घटकांना बाहेर पडतांना टोपी वापरण्याच्या तसेच जास्तीत जास्त पाणी पिण्याच्या सूचना केलेल्या आहेत.

### नवी मुंबईकर नागरिकांनाही उन्हाळा कालावधीत दक्षता घेण्याचे आवाहन

नागरिकांनीही कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो बाहेर पडणे टाळावे. बाहेर जाणे आवश्यक असल्यास टोपी, छत्री किंवा ओढणीचा वापर करावा. दररोज किमान ५ ते ६ ग्लास पाणी प्यावे. नारळपाणी, ताक, लिंबू पाणी आणि ताज्या फळांच्या रसाचे सेवन करावा. डोके दुखणे, चक्कर येणे, अशक्तपणा ही डिहायड्रेशनची लक्षणे असू शकतात हे लक्षात घेउन अशी समस्या उद्भवल्यास त्वरित पाणी प्यावे आणि आवश्यकतेनुसार वैद्यकीय सल्ला घ्यावा. विशेषत्वाने लहान मुले, गरोदर महिला, वयोवृध्द नागरिक यांची अधिक काळजी घ्यावी असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# लोकशाही दिनी गैरहजर अधिकाऱ्यांवर कारवाई

## जिल्हाधिकारी कारणे दाखवा नोटीस बजावणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

सामान्य नागरिकांच्या रखडलेल्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी राबवण्यात येणारया 'लोकशाही दिन' या संकल्पनेवर प्रशासनाच्या उदासीनतेमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय लोकशाही दिनाला बहुतांश विभागांचे अधिकारी गैरहजर राहिले. यामुळे जिल्हाधिकारी किशन जावळे अ‍ॅक्शन मोडवर आले आहेत. गैरहजर अधिकारयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सोमवारी ४ मे रोजी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नियमांनुसार, नागरिकांनी प्रथम तालुका लोकशाही दिनात आपली तक्रार मांडायची असते आणि समाधान न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात ती पुढे नेण्याची संधी दिली जाते. याच पार्श्वभूमीवर तालुकास्तरीय लोकशाही दिनात समाधान न झालेल्या अनेक नागरिकांनी आज मोठ्या अपेक्षेने आपली गाऱ्हाणी घेऊन हजेरी लावली होती. मात्र, त्यांच्या अपेक्षांना धक्का बसला, कारण संबंधित विभागांचे बहुतांश खातेप्रमुख उपस्थितच नव्हते.



### जबाबदारीने वागण्याची गरज

लोकशाही दिनाच्या उपक्रमाकडेच प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याचे आजच्या घटनेतून स्पष्ट झाले आहे. नागरीकांचे प्रलंबित प्रश्न निकाली निघावेत यासाठी ही संकल्पना पुढे आली, मात्र ही संकल्पनाच निकाली काढण्याचा घाट घातला जात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. नागरिकांच्या प्रश्नांचे त्वरित निराकरण करण्यासाठी तयार केलेल्या या यंत्रणेची विश्वासार्हता टिकवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने वागण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

लोकशाही दिनास उपस्थित असलेले माजी आमदार पंडित पाटील यांनी ही अधिकारयांच्या हलगर्जीपणाबददल नाराजी व्यक्त केली. याबाबत जिल्हाधिकारी जावळे यांना जाब विचारला. त्यानंतर ही बाब आपण गांभीर्याने घेत असून संबंधित सर्व अधिकारयांना कारणे दाखवा नोटीस बजावणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पुढील प्रत्येक लोकशाही दिनाला आपण स्वतः हजर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# तीन हजार टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे रोहा पालिकेसमोर आव्हान

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने शून्य कचरा ही संकल्पना राबवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्या दृष्टीने नगर परिषदेने नियोजन केले आहे. सध्या कचरा विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहे.

रोहा अष्टमी नगर परिषदच्या डम्पिंग ग्राउंडमध्ये १५ हजार टन कचरा होता. त्यावर योग्य प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ३००० टन कचरा सध्या डम्पिंग ग्राउंडमध्ये आहे. या कचऱ्याचे विलगीकरण व त्या प्रक्रिया यासाठी मोठे आव्हान रोहा अष्टमी नगर परिषदेला आहे. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी किमान २ ते ३ महिने लागण्याची शक्यता असल्याचे अधिकारी वर्गाकडून सांगण्यात येत आहे.

कचऱ्याचे विलगीकरण करण्यासाठी जुन्या मशीनची सर्विसिंग करून नव्याने काम सुरू करण्यात आले आहे, तर दुसरीकडे नव्याने कचरा विलगीकरण करण्यासाठी नवीन ट्रॉमल मशीन आणण्यात आली आहे.

डम्पिंग ग्राउंडमध्ये ३००० टन जुना कचरा शिल्लक आहे. याचबरोबर नव्याने रोज येणारा कचरा याचे विल्हेवाट लावण्यासाठी नगर परिषदेने जोरदार काम सुरू केले आहे. पावसाळ्याच्या आधी कचरा विल्हेवाट लावण्याची नियोजन करण्यात आले आहे.



सध्या ग्राउंडमध्ये असलेल्या कचरा डेपोवर भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात दिसून येत असून या ठिकाणी भटके गुरेही मोठ्या प्रमाणात आहेत. दुसरीकडे कचऱ्याला आग अधून मधून लागत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे धुराचे लोट उठत आहेत. कचरा डेपोचे गेट तुटल्यामुळे बिनधास्तपणे कुत्रे, गुरांचा वावर असतो. आजु बाजुच्या परिसरात प्लास्टिक उडून जात असल्याचे दिसून येते

नव्याने नगराध्यक्षपदाची धुरा वनश्री शेडगे यांनी स्वीकारल्यानंतर स्वच्छ रोहा सुंदर रोहा हे संकल्पना हाती घेत कचरा निर्मूलन रोहा अष्टमी शहरात जोरदार चालू केले आहे. जनजागृती, फलक, कचरा संकलन काम सुरू आहे.

खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून कुंडलिका नदी संवर्धनाचे कामही सुरू असून कुंडलिका नदीला संरक्षण भिंत बांधणे व नदीपात्रातील गाळ काढणे आधी कामाला निधी मंजूर झाला असून लवकर ते काम पूर्ण होणार आहे. दुसरीकडे नदीमध्ये जाणारे सांडपाणी यावरही उपाययोजना करण्याचे काम चालू असल्याचे नगराध्यक्ष शेडगे यांनी माहिती देताना सांगितले.

# चिंचवली हद्दीत जुन्या विहिरीत आढळला मानवी सांगाडा

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील चिंचवली ग्रामपंचायत हद्दीत कालव्यालगत असलेल्या जुन्या विहिरीच्या बांधकामादरम्यान धक्कादायक प्रकार उघडकीस आला. विहिरीची साफसफाई व दुरुस्ती सुरू असताना कामगारांना विहिरीत मानवी सांगाडा आढळून आला.

चिंचवली ग्रामपंचायत सरपंच नंदू पारावे, उपसरपंच किशोर तटकरे, सदस्य विलास यादव, चंद्रकांत होळकर, उत्तम कांबळे, माजी सरपंच अशोक दायते, अंजली चव्हाण, ठेकेदार संतोष गवसकर, रामलाल जाधव ग्रामविकास अधिकारी घाडगे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी, गोरेगाव आरोग्य केंद्राचे डॉ. विनोद गोरेगावकर आणि हद्दीतील नागरिक घटनास्थळी उपस्थित होते. तत्काळ गोरेगाव पोलिसांना कळवण्यात आले. गोरेगाव पोलीस स्टेशनचे पोलिस अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अधिक तपास सुरू आहे.

# श्रीवर्धनमधील बोडणी डाग ठरतोय मृत्यूचा सापळा!

## वर्षभरात पाच भीषण अपघातांनी वाढवली धास्ती

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन–म्हसळादरम्यानचा सुमारे १६ किलोमीटरचा रस्ता निसर्गरम्य असला, तरी त्यातील जवळपास ११ किलोमीटरचा घाटमार्ग आता अपघातांचे केंद्रबिंदू बनला आहे. या घाटातील 'बोडणी डाग' हा भाग विशेषतः धोकादायक ठरत असून गेल्या एका वर्षात येथे पाच भीषण अपघात घडल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या मार्गावर तीव्र उतार, अरुंद आणि वळणदार रस्ते यामुळे वाहन चालवणे अत्यंत कौशल्याचे काम आहे, मात्र अनेक चालक रस्त्याची स्थिती आणि घाटाचे स्वरूप लक्षात न घेता बेफिकिरीने वाहन चालवत असल्याचे चित्र दिसून येत आहे. उतारावर इंधन बचतीसाठी वाहन न्यूट्रल गिअरमध्ये चालवण्याचा धोकादायक प्रयोग अनेक चालक करत असल्याने अपघातांचा धोका अधिक वाढतो. अशावेळी वाहनाचा वेग अनियंत्रित होऊन सतत ब्रेक दाबावे लागतात, परिणामी ब्रेक डिस्क गरम होऊन ब्रेक निकामी होण्याच्या घटना घडतात.

वाढत्या पर्यटनामुळे श्रीवर्धनकडे पर्यटकांची मोठी वर्दळ वाढली आहे. त्यातच तालुक्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांमुळे ट्रेलर, मायनिंग



डंपर आणि जड वाहने मोठ्या प्रमाणात या घाटातून जात आहेत. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे बोडणी डाग हा भाग 'अपघात प्रवण क्षेत्र' म्हणून कुप्रसिद्ध झाला आहे.

गेल्या वर्षातील धक्कादायक अपघातांची मालिका म्हणजे सिमेंट ब्लॉक वाहून नेणारा ट्रेलर पलटी, चालक जखमी. स्टील साहित्य घेऊन येणाऱ्या ट्रेलरचे ब्रेक निकामी, झाडावर धडकून वाहन जळाले. गॅस सिलिंडर ट्रकचा अपघात. मायनिंग ट्रक खोल दरीत कोसळला, चालक व क्लिनर जखमी. बागमांडला खाडी पुलाकडे जाणारा ट्रेलर हा पीकअप टेम्पोवर उलटून चालक जागीच ठार, पाच जण जखमी. या अपघातांनी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये संताप व भीती निर्माण केली आहे. नागरिकांच्या मते, प्रशासनाने या ठिकाणी तातडीने वेग मर्यादा फलक, धोकादायक वळणांची सूचना, रंबल स्ट्रिप्स, तसेच पोलिस गस्त वाढवणे अत्यावश्यक आहे.

"रस्ता सुंदर असला तरी सुरक्षितता अधिक महत्त्वाची," अशी प्रतिक्रिया व्यक्त करत नागरिकांनी प्रशासनाला त्वरित उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा बोडणी घाट हा भाग भविष्यात आणखी भीषण अपघातांचा साक्षीदार ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.

# मध्य रेल्वेद्वारे विदेशी पर्यटक कोट्याच्या गैरवापरावर कारवाई; ३.५६ लाख दंड वसूल

**रोहा : प्रतिनिधी**

वैध सहाय्यक कागदपत्रांशिवाय प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या बुकिंगमधील अनियमितता उघडकीस आल्यानंतर, मध्य रेल्वेने विदेशी पर्यटक (एफटी) कोट्याच्या गैरवापराविरोधातील आपली मोहीम तीव्र केली आहे. त्यानुसार ०४.०२.२०२६ रोजी गाडी क्रमांक१२२९६ संघमित्रा एक्सप्रेसमध्ये उघडकीस आले, ज्यात काही भारतीय प्रवासी विदेशी पर्यटकांसाठी अनिवार्य असलेली आवश्यक कागदपत्रे न बाळगता एफटी कोट्याच्या तिकिटांवर प्रवास करत असल्याचे आढळले.



एफटी कोट्यांतर्गत भविष्यातील तारखांच्या बुकिंगचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले. तपासणीत असे दिसून आले की, दिनांक २४.०४.२०२६ ते दिनांक ११.०६.२०२६ या कालावधीत एफटी कोट्याअंतर्गत ३१ गाड्यांसाठी मध्य रेल्वेचे १७४ ओरिजिनेटिंग पीएनआर तयार करण्यात आले होते.

एफटी कोट्याच्या तिकिटांची सत्यता पडताळण्यासाठी मध्य रेल्वे तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांकडून विशेष तपासणी करण्यात आली. या मोहिमेदरम्यान, एफटी कोट्याचा गैरवापर करून ३९ पीएनआर बुक केल्याचे आढळून आले. एकूण १२१ प्रवासी अनियमितपणे प्रवास करत असल्याचे आढळून आले. त्यांच्यावर प्रचलित नियमांनुसार शुल्क आकारण्यात आले आणि दंड म्हणून रु. ३,५६,९१६/– वसूल करण्यात आले. त्या प्रवाशांना बर्थवर बसण्याची परवानगी देण्यात आली नाही, जे नंतर आरएसी/प्रतीक्षा यादीतील प्रवाशांना वाटप करण्यात आले.

या बुकिंगमध्ये कोणतेही अधिकृत बुकिंग एजंट सामील आहेत का, हे निश्चित करण्यासाठी आयआरसीटीसीकडून अतिरिक्त तपशील मागवण्यात आला आहे. एफटी कोट्याअंतर्गत अनधिकृत बुकिंगमध्ये सामील असलेल्या व्यक्ती आणि संस्थांना ओळखण्यासाठी तपास सुरू आहे.

अपात्र कोट्यांतर्गत तिकीट बुक करणे हा रेल्वे कायद्यानुसार दंडनीय गुन्हा आहे. प्रवाशांनी ज्या कोट्याअंतर्गत तिकीट बुक केले आहे, त्यासाठी आवश्यक असलेले वैध ओळखपत्र आणि पूरक कागदपत्रे सोबत बाळगणे आवश्यक आहे.

मध्य रेल्वे प्रवाशांना आवाहन करते की, अशी कोणतीही माहिती जवळच्या कर्तव्यावर असलेल्या रेल्वे कर्मचाऱ्याला किंवा १३९ वर किंवा रेल मदत अ‍ॅपद्वारे कळवावी/सामायिक करावी. मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना प्रवास करण्यापूर्वी त्यांच्या तिकिटाची अचूकता आणि वैधता सुनिश्चित करण्याचे आवाहनही करीत आहे.

# खरवली ग्रामपंचायतीतील सदस्यांचा शिवसेनेत प्रवेश



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील खरवली ग्रामपंचायतीमध्ये महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड घडली असून, महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री तथा शिवसेना नेते भरत गोगावले यांच्या कार्यपद्धतीवर व विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या

विनया पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) ,नम्रता जाधव (राष्ट्रवादी काँग्रेस),भारती सत्वे (राष्ट्रवादी काँग्रेस),प्रशांत मोरे (राष्ट्रवादी काँग्रेस),कल्पेश मोरे (शेतकरी कामगार पक्ष) या सदस्यांनी त्यांच्या समर्थकांसह शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव तालुक्यात वेगाने होत असलेला सर्वांगीण विकास, जनतेशी असलेला थेट संवाद आणि प्रश्न सोडवण्याची तत्परता यामुळे प्रभावित होऊन या सदस्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रवेशामुळे माणगाव तालुक्यात शिवसेनेची ताकद आणखी बळकट झाली असून, आगामी काळात विकासकामांना अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना मंत्री गोगावले यांनी सर्व नव्याने प्रवेश केलेल्या सदस्यांचे स्वागत करत जनतेच्या विकासासाठी कटिबद्ध राहून एकत्रितपणे काम करू असे सांगितले.

या पक्ष प्रवेश समारंभा प्रसंगी प्रमोद घोसाळकर (जिल्हाप्रमुख), महेंद्र मानकर (तालुकाप्रमुख) डॉ. अमेय प्रभाकर उभारे, सुशिल शिंदे (साई गण संपर्क प्रमुख), विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्जत शहरात पावसाचा शिडकावा

**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या चार–पाच दिवसांपासून तापमानात वाढ होत असल्याने उकड्याने हैराण झालेल्या कर्जतकरांना गुरुवारी दुपारी पडलेल्या पावसाने दिलासा दिला.

गेल्या आठवड्यापासून तापमानात लक्षणीय वाढ झाल्याने दिवस व रात्र नागरिक उकडयाने हैराण झाले होते. त्यातच ऐन झोपेच्या वेळी काल रात्री अकरापासून ते पहाटे चार वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित झाल्याने कर्जतकरांच्या झोपेचे खोबरे झाले होते. आज सकाळपासून उकड्यामुळे सर्वजण हैराण झाले होते. दुपारी तर अंगाची लाही–लाही होत होती. तीनच्या सुमारास पावसाने सुरुवात केली. वाराही सुटला. त्यामुळे उकड्याने हैराण झालेल्या कर्जतकारांना थोडासा दिलासा मिळाला.

# गीत जगदीश कार्यक्रमाने अलिबागकर मंत्रमुग्ध

## गीतकार जगदीश खेबुडकर यांच्या आठवणींना उजाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे... हे १९६७ साली प्रदर्शित झालेल्या साधी माणसं चित्रपटातील गीत असो किंवा १९७१ साली प्रदर्शित झालेल्या पिंजरा सिनेमातील अवीट गोडीची गाणी असो... यासारखी शेकडो गाणी ज्यांच्या लेखणीतून अवतरली, ते ख्यातनाम कवी,गीतकार जगदीश खेबुडकर यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून अलिबागेत आयोजित " गीत जगदीश" या संगीत कार्यक्रमाने अलिबागकर मंत्रमुग्ध झाले.

कै.जगदीश खेबुडकर फौंडेशन आयोजित आणि अलंकार कला अकादमी फौंडेशन निर्मित, रसिकरंजन वाद्यवृंद कोल्हापूर प्रस्तुत "गीत जगदीश" हा संगीतमय कार्यक्रम अलिबाग मधील पी एन पी नाट्यगृहात ३ मे रोजी आयोजित करण्यात आला. जगदीश खेबूडकर यांचे धाकटे सुपुत्र मुकुल खेबूडकर यांचा सहभाग हा या कार्यक्रमाचे महत्व अधोरेखित करणारे होता."गीत



जगदीश" या कार्यक्रमाची सुरुवात " अष्टविनायका तुझा महिमा असा" ..या गीताने झाली. आणि त्यानंतर कार्यक्रम रंगत केला. गीतकार जगदीश खेबुडकर यांच्या लावण्या, भक्तिगीत, प्रेमगीत, या सारखे अनेक गीत प्रकार कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिका प्रेक्षकांसमोर सादर झाले. शब्दप्रभू ...अशी उपमा त्यांना का मिळाली याचा प्रत्यय कार्यक्रमाच्या माध्यमातून येत होता.

कोणत्याही कार्यक्रमात निवेदकाची भूमिका फार महत्त्वाची ठरते. कार्यक्रमाची उंची वाढविणे, समोर बसलेल्या प्रेक्षकांना खिळवून ठेवणे याचे कसब निवेदकाकडे असावे लागते. "गीत जगदीश" या कार्यक्रमासाठी लाभलेले निवेदक विश्वराज जोशी यांनी ही भूमिका उत्तम रीतीने पार पाडताना कै. जगदीश खेबुडकर यांचा जीवन प्रवास मोठ्या खुबीने रसिकांसमोर मांडला. मध्येच कोल्हापुरी भाषेचा तडका निवेदनाची रंजकता वाढवत होता.

गायिका वेदा सोनुले, वैदेही जाधव, स्मिता घोसरवाडकर गायक सीताराम जाधव, संदीप सोनुले, महेश सोनुले (संगित संयोजक) बालगायक सारंग सोनुले यांच्या सुमधुर आवाजात ही मैफिल उत्तरोत्तर रंगत गेली. या गायकांना सिंथेसायजरवर स्वानंद जाधव, प्रध्नेश वाघमारे, अ‍ॅक्टोपॅडवर गुरू ढोले, तबला, सोहम जाधव ढोलकी हणमंत चौगुले,साईड रिदम सचिन पन्हाळकर यांनी साद दिली. ध्वनी आणि प्रकाशयोजना शेखर गुळवणी अशोक मोरस्कर यांची होती.

पहिल्या गीतापासून मध्यंतरपर्यंत कार्यक्रमाने रसिकांच्या मनावर गारूड केले. यामध्ये मुकुल खेबूडकर यांची निवेदक जोशी यांनी घेतलेल्या मुलाखतीतून जगदीश खेबुडकर यांचा जीवन प्रवास, गीतकार आणि कवी हा प्रवास उलगडत गेला. गाण्याची जन्मकथा ऐकायला मिळाली. अनेकांना या कार्यक्रमात जगदीश खेबूडकर खऱ्या अर्थाने माहीत झाले. विशेष म्हणजे त्यांच्या रेकॉर्ड मुलाखती आणि कार्यक्रमातून प्रत्यक्षात गाण्या मागच्या काही घटना, गोष्टी रसिकांच्या समोर सादर झाल्या.

# कर्जत फाटा येथे वाहतूक पोलीस आणि सिग्नल सेवा उपलब्ध करावी; स्थानिकांची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार, म्हणजे जुन्या मुंबई–पुणे महार्गावरून चौक हद्दीतून कर्जतकडे जाणाऱ्या कर्जत फाटा येथे वाहतूक पोलीस आणि सिग्नल सेवा उपलब्ध करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. याबाबत लवकरच वाहतूक पोलीस, आयआरबी आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडे निवेदन देण्यात येणार आहे.

कर्जत फाटा हा नेहमी गजबजलेला असतो. कर्जतमार्गे प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण माथेरान, मुरबाड,नाशिक, कल्याण, डोंबिवलीकडे जाणे सोयीचे आहे. चौक–कर्जत रस्ता, पनवेल–खोपोलीदरम्यान दांडफाटा ते खालापूर परिसरात धनिकांचे फार्महाऊस, रिसॉर्ट



मोठ्या प्रमाणात आहेत. कर्जत फाटा येथे हॉटेल, बार, रेस्टॉरंट यांनी गजबजलेला परिसर आहे. चारही दिशेला हॉटेल असल्याने खवय्यांची हॉटेल चॉइस असते. त्यामुळे वेडीवाकडी वाहने बळजबरीने पुढे नेण्याचा प्रयत्नात वाहतूक कोंडी होत आहे. शनिवारी, रविवारी तर कर्जतकडे जाणाऱ्या गाड्यांचे प्रमाण अधिक असते.

येथे इंडिकेटर सिग्नल आहेत, मात्र ते बंद दिसतात. कायमस्वरूपी सिग्नल सेवा सुरू झाल्यास बऱ्यापैकी कोंडी सुटेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. खालापूर पोलीस ठाणे व दूरक्षेत्र चौक येथील पोलीस ही कोंडी सोडविण्याचा प्रयत्न करतात, पण कायदेशी अधिकार नसल्याने त्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. म्हणून येथे वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्यात यावी, यासाठी भाजपचे स्थानिक नेते व वैद्यकीय सेल खालापूर तालुका अध्यक्ष विजय ठोसर मागणीचा पाठपुरावा करत आहेत.

# विजयासह हैदराबाद अव्वल स्थानी



## पंजाबवर मात

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबादने घरच्या मैदानात पंजाब किंग्सचा ३३ धावांनी पराभव करत गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यर याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता, मात्र पंजाबच्या खराब क्षेत्ररक्षणाचा फायदा घेत सनरायझर्स हैदराबादने निर्धारित २० षटकांत चार विकेट्स गमावत २३५ धावा केल्या. या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना कूपर कॉलॉनी याने नाबाद शतकी खेळी केली, पण त्याची ही खेळी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. अखेरीस पंजाब किंग्सला पराभव पत्करावा लागला.

हैदराबादने नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड जोडीने संघाला धमाकेदार सुरुवात करुन दिली. अभिषेक शर्मा १३ चेंडूत ३५ धावा आणि ट्रॅव्हेस हेड १९ चेंडूत ३८ धावा करून परतल्यावर लॉकी फर्ग्युसन आणि युझवेंद्र चहलनं यांनी ईशान किशन आणि क्लासेन यांना स्वस्तात माघारी धाडण्यासाठी जाळे विणले, पण क्षेत्ररक्षकांनी गोलंदाजांना साथ दिली नाही. दोघांचे तीन झेल सुटले. याचा फायदा उठवत त्यांनी अर्धशतके झळकावली. या तीन चुकांची किंमत पंजाब किंग्सला पराभवासह मोजावी लागली.

ईशान किशन याने ३२ चेंडूत दोन चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ५५ धावा केल्या. हेन्री क्लासेन याने ४३ चेंडूत तीन चौकार आणि ३४ षटकारांच्या मदतीने ६९ धावांची दमदार खेळी केली. अखेरच्या षटकात नितिश कुमार रेड्डीने १३ चेंडूत नाबाद २९ धावांची खेळी करत सनरायझर्स हैदराबादच्या धावफलकावर चार बाद २३५ धावा लावल्या. पंजाबकडून गोलंदाजीत अर्शदीप सिंग, युझवेंद्र चहल, लॉकी फर्ग्युसन आणि विजयकुमार वैशाक यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

हैदराबाद संघाने दिलेल्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना पंजाब किंग्सची सुरुवात खराब झाली. प्रियांश आर्य १ (३) आणि प्रभसिमरन सिंग ३ (४) जोडी स्वस्तात माघारी फिरली. कर्णधार श्रेयस अय्यरही पाच धावा करून परतला. एका बाजूने विकेट पडत असताना कूपर कॉनॉली शेवटपर्यंत मैदानात थांबला. त्याने ५९ चेंडूत सात चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने १०७ धावांची नाबाद खेळी साकारली, पण त्याची ही खेळी व्यर्थ ठरली. पंजाब किंग्सचा संघ ७ बाद २०२ धावांपर्यंतच मजल मारू शकला. हैदराबादकडून गोलंदाजीत कर्णधार पॅट कमिन्स आणि शिवांग कुमार यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय नितीश कुमार रेड्डी, एशान मलिंगा, साकीब हुसेन यांनी प्रत्येकी एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

# नवी मुंबईत बॅडमिंटन सुपर लीग

**नवी मुंबई : बातमीदार**



राज्यात पहिल्यांदाच आयोजित करण्यात येत असलेल्या फ्रँचायझी-आधारित फिनिक्स बॅडमिंटन सुपर लीग-२०२६ची घोषणा नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनने केली आहे. या स्पर्धेची अधिकृत सुरुवात करण्यापूर्वी नुकताच सर्व फ्रँचायझी मालक आणि महत्त्वाच्या भागधारकांचा एक मेळावा (ओनर्स मीट अँड ग्रीट) पार पडला. ही बहुप्रतिक्षित स्पर्धा येत्या ९ आणि १० मे रोजी वाशी येथील नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन येथे खेळवली जाणार आहे.

या स्पर्धेसाठी खेळाडूंचा लीलाव आधीच यशस्वीरीत्या पार पडला असून संपूर्ण महाराष्ट्रातील अव्वल दर्जाच्या खेळाडूंना विविध फ्रँचायझींनी आपल्या संघात सहभागी करून घेतले आहे.

महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केल्या जाणाऱ्या या लीगला विविध कॉर्पोरेट कंपन्यांनी मोठे पाठबळ दिले आहे. राज्य पातळीवरील बॅडमिंटनमध्ये अशा प्रकारे कॉर्पोरेट जगताने थेट गुंतवणूक करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या लीगमध्ये मेट्रो ग्रुप, सत्यम डेव्हलपर्स आणि प्रियांका रीजन्सी या रिअल इस्टेट क्षेत्रातील नामांकित कंपन्यांसह प्रसिद्ध स्टेशनरी ब्रँड 'डॉम्स'ने संघ खरेदी केले आहेत तसेच संरक्षण क्षेत्रातील क्रास्नी डिफेन्स आणि एनडीटी टेक्नॉलॉजीज यांनीही संघ मालक म्हणून यात गुंतवणूक केली आहे. भारतातील आघाडीची क्रेन भाड्याने देणारी संस्था फिनिक्स इन्फ्राकॉन सोल्युशन्स या लीगची मुख्य प्रायोजक (टायटल स्पॉन्सर) आहे, अशी माहिती स्पर्धेचे आयोजक आणि माजी विजेते बॅडमिंटनपटू श्रीशैल मितकरी यांनी दिली.

या स्पर्धेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये तब्बल १० लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्रात या पातळीवर आयोजित होणाऱ्या बॅडमिंटन स्पर्धांमध्ये ही आतापर्यंतची सर्वात मोठी बक्षीस रक्कम मानली जात आहे. गेल्या वर्षी वाशीच्या याच मैदानावर पार पडलेली बॅडमिंटन सुपर लीगची पहिली आवृत्ती कमालीची यशस्वी ठरली होती आणि तिने राज्यातील क्रीडा क्षेत्रात मोठी छाप पाडली होती. त्या पहिल्या हंगामात १० फ्रँचायझी संघांमधील ८० प्रतिभावान खेळाडूंनी सहभाग घेतला होता तसेच ५०० हून अधिक प्रत्यक्ष प्रेक्षकांनी स्टेडियमवर येऊन आणि १० हजारांपेक्षा जास्त ऑनलाईन चाहत्यांनी या स्पर्धेचा थरार अनुभवला होता. यंदाच्या वर्षी ही स्पर्धा त्याहूनही अधिक भव्य आणि चुरशीची होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# भूमी म्हात्रेची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड



**उरण : वार्ताहर**


उरण तालुक्यातील गोवठणे गावची सुकन्या सुकन्या भूमी आनंद म्हात्रे हिची रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी आदीप्रचितीत ट्रॅव्हल्स, तुरुंबवाडी, म्हसळा या संघात निवड झाली आहे भूमी म्हात्रे ही जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरेची विद्यार्थिनी आहे. लहानपणापासून स्पर्धेची आवड असणाऱ्या भूमीने शालेय, तालुका, जिल्हास्तरावर कबड्डीत नावलौकिक मिळवलेला आहे. ती मार्शल आर्ट्सचे धडेसुद्धा विद्यालयातील क्रीडा शिक्षक शुभम ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली घेत आहे.

रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत निवड झाल्याबद्दल आत्माराम ठाकूर मिशन संस्थेचे अध्यक्ष प्रतिक ठाकूर, जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे, व्यवस्थापन कमिटीचे सदस्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, आप्तेष्ट, मित्रपरिवार या सर्वांनी भूमीचे अभिनंदन केले व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# आयसीएन मुंबईच्या शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रणव पुजारीला विजेतेपद

**अलिबाग : प्रतिनिधी**

आयसीएन मुंबई संस्थेतर्फे नरीमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे घेण्यात आलेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेच्या पुरुष फिटनेस प्रकारात अलिबागच्या प्रणव उमेश पुजारी याने विजेतेपद पटकावले. या यशस्वी कामगिरीमुळे १२ ते १४ जूनदरम्यान इंडोनेशियातील बाली येथे होणाऱ्या जागतिक चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी प्रणव याला मिळणार आहे.



देशभरातील तसेच परदेशातील फिटनेसप्रेमी आणि बॉडी बिल्डर्ससाठी प्रतिष्ठेची मानली जाणारी आयसीएन नॅचरल या जागतिक संघटनेतर्फे आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा पूर्णपणे नॅचरल बॉडी बिल्डिंगला प्रोत्साहन देणारी असल्याने जगभरातील खेळाडूंमध्ये तिचे वेगळे स्थान आहे. या स्पर्धेची सर्वात मोठी खासियत म्हणजे ड्रग टेस्टिंग, वाडा-मान्य पद्धतीनुसार स्पर्धकांची तपासणी केली जाते. स्टेरॉइड्स किंवा कोणत्याही प्रकारचे परफॉर्मन्स वाढवणारे औषध वापरल्यास स्पर्धकाला तत्काळ अपात्र ठरवले जाते. यामुळे ही स्पर्धा बॉडी बिल्डिंगमधील नैसर्गिक आणि प्रामाणिक खेळाडूपणा जपणारी स्पर्धा म्हणून ओळखली जाते. प्रत्येक कॅटेगरीमध्ये स्पर्धकांचे मूल्यमापन शरीराची सिमेट्री, मसल डेफिनिशन, स्टेजवरील प्रेझेन्स, पोझिंग आणि फिटनेस लेव्हल या निकषांवर केले जाते. भारतातील खेळाडूंसाठी ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख निर्माण करण्याची मोठी संधी ठरते.

२६ एप्रिल रोजी आयसीएन मुंबई संस्थेतर्फे नरीमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी भाग घेतला होता. पुरुष फिटनेस प्रकारात अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील प्रणव पुजारी याने चमकदार कामगिरी करीत विजेतेपद पटकावले. त्याला रोख रक्कम, स्मृतीचिन्ह असे पारितोषिक पटकावले.

# कुपर कॉनोलीचे विक्रमी शतक

**हैदराबाद : वृत्तसंस्था**



पंजाब किंग्स संघाला आयपीएल २०२६मध्ये सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. सनरायझर्स हैदराबादने पंजाबचा ३३ धावांनी पराभव करत मागील पराभवाचा बदला घेतला. यासह आता पहिल्या स्थानी असणारा पंजाबचा संघ दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. पंजाब किंग्ससाठी अखेरच्या चेंडूपर्यंत एकटा कुपर कॉनोली लढत होता, यादरम्यान त्याने शतक खेळीही केली. या शतकाच्या बळावर त्याने मोठा विक्रमही आपल्या नावे केला आहे.

कुपर कॉनोलीने एका टोकाकडून विकेट्स पडत असताना एकट्याने झुंज देत संघाचा शानदार खेळी केली. त्याने ५९ चेंडूंमध्ये सात चौकार आणि आठ षटकारांसह नाबाद १०७ धावा केल्या. त्याचा स्ट्राईक रेट १८१.३५ होता. कूपर कॉनोलीने हे शतक अवघ्या २२ वर्षे आणि २५७ दिवसांच्या वयात पूर्ण केले, ज्यामुळे तो आयपीएलच्या इतिहासात शतक करणारा सर्वात तरुण विदेशी खेळाडू ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम क्विंटन डी कॉकच्या नावावर होता, ज्याने वयाच्या २३ वर्षे आणि १२२ दिवसांत हा पराक्रम केला होता.

# आठव्यांदा २००पेक्षा अधिक धावसंख्या उभारत हैदराबादची मुंबईशी बरोबरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


हैदराबादच्या संघाने आयपीएल इतिहासातील पंजाब किंग्सविरुद्धची दुसरी सर्वोच्च धावसंख्या उभारताना मुंबई इंडियन्सच्या खास विक्रमाशी बरोबरी करण्याचा डाव साधला.

हैदराबाद येथील राजीव गांधी स्टेडियमवर रंगलेल्या पजांब किंग्सविरुद्धच्या सामन्यात अभिषेक शर्मा आणि ट्रॅविस हेड या सलामीवीरांनी सनरायझर्स हैदराबादच्या संघाला धमाकेदार सुरुवात करून दिली. हेन्री क्लासेन आणि ईशान किशनचा शानदार शोसह अखेरच्या षटकात नितीश कुमार रेड्डीने मोठा धमाका केला. या पाच जणांच्या खेळीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादच्या संघाने निर्धारित २० षटकात ४ बाद २३५ धावा केल्या.

आयपीएलच्या इतिहासात एका संघाविरुद्ध सर्वाधिक आठ वेळा २००पेक्षा अधिक धावा करण्याचा रेकॉर्ड याआधी मुंबई इंडियन्सच्या नावे होता. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध त्यांनी ही कामगिरी नोंदवली होती. आता सनरायझर्स हैदराबादच्या संघाने पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात आठव्यांदा २००पेक्षा अधिक धावसंख्या उभारत मुंबईची बरोबरी केली आहे.

# अभिषेक शर्माने मोडला ख्रिस गेलचा रेकॉर्ड!

**मुंबई : प्रतिनिधी**



आयपीएल २०२६ स्पर्धेत अभिषेक शर्माच्या फलंदाजीचा बोलबाला पहायला मिळाला आहे. ऑरेंज कॅपच्या शर्यतीत पुढे असलेल्या अभिषेकने पंजाब किंग्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात १३ चेंडूत दोन चौकार आणि चार षटकारांचा सहाय्याने ३५ धावांची खेळी केली. त्यानंतर तो बाद झाला. पण त्याच्या नावे एका मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.

अभिषेक शर्मा आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो. आतापर्यंत त्याने अनेकदा आक्रमक सुरुवात करून दिली आहे. आताही त्याने छोटी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने चार खणखणीत षटकार खेचले. यादरम्यान ३० धावांचा आकडा गाठताच त्याने माजी फलंदाज ख्रिस गेलचा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

अभिषेक शर्मा हा आयपीएलमध्ये सलामीवीर फलंदाज म्हणून २००पेक्षा अधिकच्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना ३०पेक्षा अधिक धावांची खेळी करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहचला आहे. अभिषेक शर्माने आतापर्यंत १४ वेळेस हा कारनामा केला आहे, तर ख्रिस गेलने १३ वेळेस असा कारनामा केला होता.

# पंजाबच्या पराभवामुळे तीन संघांना दिलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आयपीएल २०२६ स्पर्धा सध्या रोमांचक वळणावर आहे. आतापर्यंत जे संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी होते, ते संघ आता खाली सरकू लागले आहेत, तर खालच्या स्थानी असलेले संघ टॉप ४मध्ये प्रवेश करण्याच्या प्रयत्नात आहेत. आतापर्यंत पंजाब किंग्सचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी होता. आता सनरायझर्स हैदराबाद आणि पंजाब किंग्स यांच्यात झालेल्या सामन्यात पंजाबला पराभवाचा सामना करावा लागला आहे. या पराभवानंतर गुणतालिकेत मोठा फेरबदल पहायला मिळाला आहे.

सनरायझर्स हैदराबाद संघाला यंदाच्या आयपीएल स्पर्धेत हवी तशी सुरुवात करता आली नव्हती, पण गेल्या पाचपैकी चार सामन्यांमध्ये हैदराबादने दमदार विजयाची नोंद केली आहे. या विजयासह हैदराबादने ११पैकी सात सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. यासह १४ गुणांसह हा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहचला आहे. आता हैदराबादकडे टॉप २मध्ये स्थान कायम ठेवण्याची संधी आहे, तर पंजाबचा संघ आतापर्यंत गुणतालिकेत अव्वल स्थानी होता, पण गेल्या तीन सामन्यांमध्ये पंजाबला लागोपाठ पराभवाचा सामना करावा लागला आहे. १०पैकी ६ सामने जिंकून १३ गुणांसह पंजाबचा संघ गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी घसरला आहे.

पंजाबच्या पराभवामुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स या संघांना दिलासा मिळाला आहे, कारण या संघांकडेदेखील टॉप २मध्ये फिनिश करण्याची संधी आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स या तिन्ही संघांनी आतापर्यंत प्रत्येकी १२-१२ गुणांची कमाई केली आहे, तर चेन्नई सुपर किंग्स संघ १० गुणांसह गुणतालिकेत सहाव्या स्थानी आहे.



# बुद्धिबळपटू अन्वी हिंगेची गरूडझेप

### जगातील सर्वांत युवा महिला कँडिडेट्स मास्टरचा बहुमान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील चिंचवडच्या अन्वी हिंगेने जागतिक बुद्धिबळाच्या पटलावर मोठी झेप घेताना वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी 'महिला कँडिडेट्स मास्टर' (डब्ल्यूसीएम) किताब पटकावला. या किताबाची सर्वांत युवा मानकरी ठरण्याचा मान तिने मिळवला आहे.

गेल्या महिन्यात स्पेनमधील ॲलिकांटे येथील प्रतिष्ठेच्या 'एक्स' स्पर्धेत अन्वीने नऊ फेऱ्यांत ६.५ गुण मिळवले आणि रेटिंगमध्ये ती थेट एलो १८०० गुणांच्या पुढे गेली. स्पर्धेत ती एकूण संयुक्त चौथ्या क्रमांकावर राहिली, परंतु महिलांच्या गटात ती विजेती ठरली आणि जगातील सर्वांत युवा 'डब्ल्यूसीएम' बनली. यासह तिने नऊ वर्षांखालील गटाच्या क्रमवारीत अग्रस्थानही पटकावले.

अन्वीने अतिशय लहान वयातच उल्लेखनीय यश मिळवले आहे. सात वर्षांखालील गटात राज्य विजेती, राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक विजेती अशी तिची कामगिरी आहे. २०२५मध्ये ग्रीसमध्ये झालेल्या 'फिडे वर्ल्ड कॅडेट अँड यूथ' स्पर्धेत तिने आठ वर्षांखालील गटात रौप्यपदक जिंकले तसेच मलेशियातील राष्ट्रकुल स्पर्धेतही ती उपविजेती ठरली. गतवर्षी ताजिकिस्तान येथे झालेल्या पश्चिम आशियाई युवा बुद्धिबळ स्पर्धेत तिने दोन सुवर्ण व चार रौप्यपदके पटकावली होती.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com